SONi TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

कुटुंब, मित्र आणि निसर्गासोबत एक अविस्मरणीय दिवस!
आमरस पार्टी वनभोजन
ह्या सुट्टीचा महाआनंद आणि धमालच धमाल....
रेन डान्स / बोटींग / पपेट शो
बर्डपार्क / झीप लाईन
ॲडव्हेंचरर्स / वॉटर स्पोर्टस्
डॉ. कांकरियांचे साईबन
9112288622
9850500905 / 9096639368
डॉ. कांकरियांचे साईबन कृषी पर्यटन केंद्र, एम.आय.डी.सी.मागे, अहिल्यानगर

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २६.०६.२०२६ | अंक नं. ०७४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

चांदीमधील चैन, ब्रासलेट, अंगठी, पेंडन्टच्या 3000 पेक्षाही अधिक डिझाईन्स
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
सोन्याच्या दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
₹ १९९/-*
Conditions Apply*

# स्मार्ट मीटरच्या नावाखाली ग्राहकांची दिशाभूल; महावितरणच्या गलथान कारभाराविरोधात संताप



नगर – महावितरणच्या नावाने सध्या सोशल मीडियावर एक संदेश मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत असून, त्यात ४८ तासांत स्मार्ट मीटर बसवण्याची सूचना देण्यात आली आहे. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले असून, स्मार्ट मीटर बसवल्यानंतर वीज बिलात मोठी वाढ होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. एकीकडे मुख्यमंत्री आणि ऊर्जा विभागाने स्मार्ट मीटर सक्तीचे नसल्याचे जाहीर केलेले असताना, दुसरीकडे महावितरणकडून सुरु असलेल्या या प्रकारामुळे ग्राहकांमध्ये संभ्रम आणि संताप पसरला आहे.

शहरातील वीजपुरवठ्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. किरकोळ पाऊस किंवा वाऱ्याच्या एका झुळुकीने तासनतास वीजपुरवठा खंडित होतो. जीर्ण झालेले विजेचे खांब आणि गंजलेल्या तारांमुळे नागरिक त्रस्त आहेत. मेंटेनन्सच्या नावाखाली दर शनिवारी वीज पुरवठा बंद ठेवला जातो, तरीही वर्षभरात मोठ्या प्रमाणावर वीज कपात होते. वीज वितरण कंपनी वीज वहन भार, कर आणि भाड्याची वसुली १०० टक्के करत असली, तरी प्रत्यक्षात मात्र २४ तास अखंड वीजपुरवठा देण्यात कंपनी पूर्णपणे अपयशी ठरली आहे. त्यामुळे 'स्मार्ट मीटर बसवण्यापूर्वी महावितरणने स्वतः स्मार्ट व्हावे', अशी तीव्र मागणी जागरूक नागरिक करत आहेत.

या सर्व प्रकारात महावितरणने स्थापन केलेली 'होयबा समिती' ग्राहकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. वीज दर वाढ, मीटर भाडे आणि इतर करांबाबत या समितीने घेतलेले निर्णय ग्राहकांच्या माथी मारले जातात आणि त्याविरुद्ध दाद मागण्यासाठी अपील करण्याची कोणतीही सोय नाही. सोलर सिस्टिम बसवताना दाखवलेल्या फायद्यांच्या गाजरांप्रमाणेच आता स्मार्ट मीटरचे आमिष दाखवून नंतर पॉलिसीमध्ये सोयीस्कर बदल करून ग्राहकांना आर्थिक फटका देण्याचा डाव महावितरणचा असल्याचा आरोप होत आहे.

या पार्श्वभूमीवर, नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन जागरूक नागरिक मंचतर्फे सुहासभाई मुळे यांनी केले आहे. कोणीही बळजबरीने स्मार्ट मीटर बसवून घेऊ नये आणि असा प्रकार घडल्यास ठामपणे विरोध करावा. ग्राहकांनी या मनमानी कारभाराविरुद्ध १८००-२१२-३४३५ किंवा १९१२ या टोल फ्री क्रमांकावर आपल्या तक्रारी नोंदवाव्यात. महावितरणने आधी दर्जेदार सेवा द्यावी आणि मगच स्मार्ट तंत्रज्ञानाचा अट्टाहास करावा, असा इशारा दिला आहे.

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे
(आकर्षक पगार)
भेटा : कोहिनूर समोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

# महामार्गांवरील फलकांवर 'अहिल्यानगर' व 'छत्रपती संभाजीनगर' नावे त्वरित लावावीत

## सात दिवसांत कार्यवाही सुरु न केल्यास आंदोलन करणार : हिंदु जनजागृती समिती



महामार्गांवरील फलकांवर 'अहिल्यानगर' व 'छत्रपती संभाजीनगर' नावे त्वरित लावावीत, या मागणीचे निवेदन हिंदू जनजागृती समितीच्यावतीने निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांना देण्यात आले.

नगर – महामार्गांवरील दिशादर्शक व अंतर दर्शविणाऱ्या फलकांवर अद्यापही जुनी नावे वापरली जात असल्याने ती तातडीने बदलून 'अहिल्यानगर' व 'छत्रपती संभाजीनगर' ही अधिकृत नावे दर्शविण्यात यावीत, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन निवासी जिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, 'अहमदनगर'चे 'अहिल्यानगर' आणि 'औरंगाबाद'चे 'छत्रपती संभाजीनगर' असे नामकरण होऊन बराच कालावधी लोटला आहे. मात्र, विविध राष्ट्रीय व राज्य महामार्गांवरील अनेक दिशादर्शक फलकांवर अजूनही जुन्याच नावांचा उल्लेख दिसून येतो. त्यामुळे प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण होत असून अधिकृत शासकीय निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी झालेली दिसत नाही.

या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर व छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या सर्व महामार्गांवरील तसेच शहरांच्या हद्दीतील जुने फलक बदलून नव्या नावांचे फलक तातडीने लावावेत, अशी मागणी करण्यात आली. तसेच प्रशासनाने येत्या सात दिवसांत याबाबत कार्यवाही सुरू न केल्यास आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

निवासी जिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांनी निवेदन स्वीकारून यासंदर्भात सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन दिले. यावेळी हिंदु जनजागृती समितीचे रामेश्वर भुकन, जिल्हा हिंदु संघटक बापू ठाणगे, संजय जोशी, दिगंबर गेंट्याल, चैतन्य शेकडे व प्रतिनिधी उपस्थित होते.

मनमाड रोड टच कमर्शियल
फ्लॅट भाड्याने देणे आहे
सिव्हिल हॉस्पिटल जवळील, लोकमत व नॅचरल आईस्क्रीम शेजारी, कोहिनूर प्लाझा मधील कमर्शियल पहिल्या मजल्यावरील
700 स्क्वे.फू. फ्लॅट भाड्याने देणे आहे
Mo. 9881141240

जाहीर निवेदन
अहमदनगर गॅस कंपनी,
गुरुकूल अपार्टमेंट, सातपुते तालीमसमोर, नालेगाव, अहिल्यानगर,फोन नं.२३४४८२४/२३४१८३३
आमच्या सर्व एच.पी.ग्राहकांना कळविण्यात येते की, ज्या ग्राहकांचे e-KYC झालेले नाही. त्यांनी गॅस पुस्तक व आधारकार्ड झेरॉक्स घेऊन त्वरित ऑफिसमध्ये संपर्क साधावा. म्हणजेच सिलेंडर मिळण्यास अडचण येणार नाही.
टीप : दुसऱ्या सिलेंडरसाठी व नवीन कनेक्शनसाठी संपर्क साधावा. नाव नोंदणी चालू आहे.

जैन सोशल फेडरेशन द्वारा संचलित
आनंदऋषिजी नेत्रालय
(तारकपूर शाखा)
गंगा उद्यान रोड, तारकपूर, अहिल्यानगर.
आनंदऋषिजी हॉस्पिटल येथील हृदयरोग तज्ञ डॉक्टरांची
कार्डियाक ओपीडी
आता तारकपूर मध्ये..
डॉ. अनिकेत कटारिया | डॉ. अमित भराडिया
M.D. Medicine, DNB (Cardiology)
FSCAI (USA)
Consultant & Interventional Cardiologist
दररोज – सोमवार ते शनिवार, सायं. ५.00 ते ७.00 पर्यंत
– अधिक माहिती व नांव नोंदणीसाठी संपर्क –
M. 8686301515

# एकाच दिवशी तिघांची गळफास घेत आत्महत्या

नगर – नगर जिल्ह्यात २५ जून रोजी एकाच दिवशी आत्महत्येच्या तीन वेगवेगळ्या घटना समोर आल्या आहेत. नगर तालुका, बेलवंडी (श्रीगोंदा) आणि राजूर (अकोले) पोलीस ठाण्यांच्या हद्दीत तीन जणांनी गळफास घेत आपले जीवन संपवले आहे. या तिन्ही घटनांबाबत संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पोलीस या आत्महत्यांमागील कारणांचा शोध घेत आहेत.

आत्महत्येची पहिली घटना नगर तालुक्यातील आगडगाव येथे घडली. अर्जुन नारायण कराळे (वय ५५ , रा. आगडगाव, ता. नगर) यांनी २४ जून च्या रात्री किंवा २५ जूनच्या पहाटेपूर्वी त्यांच्या राहत्या घरी गळफास घेतला. त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना तातडीने नगरच्या सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले. मात्र डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांना मृत घोषित केले. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल लोखंडे करत आहेत.

दुसरी घटना बेलवंडी शिवारात २५ जून रोजी सकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. येथील झुंबर विठ्ठल लबडे (वय ३२, रा. बेलवंडी, ता. श्रीगोंदा) यांनी बेलवंडी गावच्या शिवारात इंडियन ऑईल पेट्रोल पंपाजवळ एका आंब्याच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. याबाबत मयूर संजय लाढाणे यांनी दिलेल्या खबरीवरून बेलवंडी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलीस हेड कॉन्स्टेबल दहिफळे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

तिसरी घटना अकोले तालुक्यातील चितळवेढे येथे घडली. बाळासाहेब बाबाजी आरोटे (वय ५९, रा. चितळवेढे, ता. अकोले) यांनी २५ जून रोजी रात्री ९.५० वाजण्याच्या सुमारास आपल्या पत्र्याच्या घरात लोखंडी अँगलला दोरीच्या सहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. त्यांना तातडीने ग्रामीण रुग्णालय राजूर येथे तपासणीसाठी आणले असता, डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या प्रकरणी राजूर पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. आकस्मात घडलेल्या या तिन्ही घटनांमुळे संबंधित गावांवर आणि नातेवाईकांवर शोककळा पसरली असून, आत्महत्येमागील नेमकी कारणे अद्याप स्पष्ट झालेली नाहीत. पोलीस त्याचा शोध घेत आहेत.



तुमचं असणं सर्व काही होतं,
आयुष्यातील ते सुंदर पर्व होतं.
आज सर्व काही असल्याची जाणीव आहे,
पण तुमचं नसणं, हीच मोठी उणीव आहे.
स्व. सुनिल चंद्रकांत कानडे
आपल्या प्रेमळ स्मृतीस
भावपुर्ण श्रध्दांजली
दशक्रिया विधी
शनिवार दि.२७ जून २०२६ रोजी सकाळी ०८:३० वा.
स्थळ : अमरधाम, नालेगांव, नेप्ती नाका, अहिल्यानगर येथे होईल
शोकाकुल
समस्त कानडे परिवार व सर्व नातेवाईक

Become a COMPUTER PROFESSIONAL
An ISO 9001:2015 Certified
DiSHA® COMPUTER INSTITUTE
PROGRAMMING
- SOFTWARE DEVELOPMENT
- DATA ANALYST & DATA SCIENCE
- FULL STACK DEVELOPMENT
DIPLOMA COURSES
- 2D & 3D ANIMATION
- ADVANCE ACCOUNTING
- CAD TRAINING PROGRAM
Enroll Now
www.dishagroup.in
दिल्ली गेट शाखा 9371051769
जुने बस स्टँड शाखा 9371151769
पाईपलाईन शाखा 7447761769

# गृहिणी

## आरोग्य

### चालणे ठरेल 'सर्वोत्तम व्यायाम'

चालणे ही दिसायला साधी पण फायद्यांनी भरलेली सवय आहे. प्राचीन काळापासून याला 'सर्व व्यायामांचा राजा' मानले जाते आणि आता आधुनिक डॉक्टरांनीही याला 'नैसर्गिक औषध'चा दर्जा दिला आहे. चालणे हृदय, फुफ्फुसे, स्नायू आणि सांधे यांना एकाच वेळी बळकट करते. यासाठी कोणतेही खास उपकरण किंवा जिमची गरज लागत नाही. रोज फक्त ३० मिनिटे वेगाने चालल्याने रक्तदाब, शुगर आणि कोलेस्ट्रॉल नियंत्रणात राहते. वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी हा सर्वोत्तम उपाय आहे, कारण यात दुखापत होण्याचा धोका कमी आणि कॅलरी बर्न जास्त होते. मानसिक ताण, चिंता व नैराश्य कमी करण्यासाठी चालणे रामबाण आहे कारण याने 'एंडोर्फिन' नावाचे आनंदी हार्मोन तयार होते. हाडे मजबूत करण्यासाठी, पचन सुधारण्यासाठी आणि झोपेची गुणवत्ता वाढवण्यासाठीही चालण्याचा उपयोग होतो. आयुर्वेदात सकाळी अनवाणी गवतावर चालणे वातशामक व डोळ्यांसाठी उत्तम मानले आहे. एकटे, मित्रांसोबत किंवा संगीत ऐकत असे अनेक प्रकारे चालता येते. महागड्या जिम मेंबरशिपपेक्षा चालणे सहज, मोफत आणि कुठेही करता येणारे असल्याने अधिक फायदेशीर ठरते.

## पाककला

### झणझणीत कटाची आमटी

**साहित्य :** चणाडाळ १/२ वाटी, सुके खोबरे किस ३ चमचे, कांदा २ मध्यम उभा चिरलेला, आले १ इंच, लसूण ८-१० पाकळ्या, ३ चमचे काळा मसाला, २ चमचे लाल तिखट, १/२ चमचा हळद, १ चमचा धणे पावडर, १/४ चमचा हिंग, चिंच कोळ १ चमचा, गूळ १ छोटा खडा, तेल ३ चमचे, मोहरी-जिरे, कडीपत्ता, चवीनुसार मीठ, कोथिंबीर २ चमचे

**कृती :** चणाडाळ कुकरला मऊ शिजवून घोटून घ्या. सुके खोबरे कोरडे भाजून घ्या. १ कांदा लालसर तळून घ्या. भाजलेले खोबरे, तळलेला कांदा, आले-लसूण मिक्सरला बारीक वाटण करा. पातेल्यात तेल तापवून मोहरी, जिरे, हिंग, कडीपत्ता यांची फोडणी करा. उरलेला बारीक चिरलेला कांदा परतून घ्या. कांदा लालसर झाला की वाटलेला मसाला घालून तेल सुटेपर्यंत परता. त्यात काळा मसाला, लाल तिखट, हळद, धणे पावडर, मीठ घालून २ मिनिट परता. घोटलेली डाळ व गरजेनुसार गरम पाणी घाला. आमटी उकळी आल्यावर चिंचेचा कोळ व गुळाचा खडा घाला. कटाला तेलाचा तवंग वर येईपर्यंत उकळू द्या. जितकी उकळेल तितकी झणझणीत लागते. वर कोथिंबीर घालून गॅस बंद करा. ही आमटी गरम भात किंवा पुरणपोळी बरोबर सर्व्ह करा.

## वास्तू

०००

✻ बेड समोर आरसा अजिबात नको. झोपेत आपलेच प्रतिबिंब दिसल्याने भीती व अस्वस्थता वाढते.

✻ घरात फुटका, तडा गेलेला आरसा ठेवू नका. याने पैशाची आवक थांबते असे मानतात.

✻ आरसा नेहमी उत्तर किंवा पूर्व भिंतीवर लावा. याने सकारात्मक ऊर्जा दुप्पट होते.

## सौंदर्य

✻ चेहरा धुण्यासाठी गरम पाणी अजिबात वापरू नका. गरम पाण्याने सुरकुत्या लवकर पडतात. थंड किंवा कोमट पाणी वापरा.

✻ रात्री झोपताना पायाच्या तळव्याला खोबरेल तेल लावा. शांत झोप लागते.

## सल्ला

फ्रीजमध्ये कांदा कापून ठेवायचा असेल तर त्यावर थोडे मीठ टाका आणि हवाबंद डब्यात ठेवा. २ दिवस वास लागणार नाही.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शनिवार, दि. २७ जून २०२६

**शनिप्रदोष, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ शुक्लपक्ष, अनुराधा २२।११, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

मेष : अडकलेली फाईल मंजूर होईल. घरासाठी नवीन वस्तू येईल. मित्र भेटेल.

वृषभ : शेअर्समध्ये फायदा होईल. नातेवाईकांकडून निमंत्रण येईल.

मिथुन : फोनवरून मोठी डील ठरेल. परीक्षेचा निकाल चांगला लागेल. गाडी घ्याल.

**कर्क** : कुटुंबासोबत जेवणाचा बेत होईल. बँकेतून कर्ज मंजूर होईल. जुना मित्र भेटेल.

**सिंह** : स्टेजवर सत्कार होईल. मुलाखतीत निवड होईल. प्रॉपर्टीचे पेपर होतील.

**कन्या** : पगार खात्यात जमा होईल. ऑफिसमध्ये नवीन जबाबदारी मिळेल.

**तूळ** : परदेशी कंपनीचा कॉल येईल. कोर्ट केस संपेल. मोठे बिल वसूल होईल.

**वृश्चिक** : जमिनीचा दर वाढेल. दुकानात गर्दी होईल. भाऊबंदकीतून वाटा मिळेल.


**धनु** : तीर्थयात्रेला जाल. देणगी मिळेल. मुलांचे शिक्षणासाठी ॲडमिशन होईल.

**मकर** : गृहप्रवेशाचा मुहूर्त निघेल. वरिष्ठ पद मिळेल. अचानक पाहुणे येतील.

**कुंभ** : नवीन शहरात बदली होईल. ऑनलाईन ऑर्डरमधून नफा होईल. गुप्त पैसा मिळेल.

**मीन** : सामाजिक संस्थेत पद मिळेल. नाव पेपरात येईल. रखडलेले लग्न जमेल. गोड पदार्थ खाल.

## शब्दगंध क्र. ७४६० सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) हिंदू वर्षातील अकरावा महिना ४) अधिक चांगला; श्रेष्ठ ६) मूर्ख; गयाळ; दरिद्री; कफल्लक ९) कंठ; आवाज; गळा १०) जखमेतून वाहणारा स्त्राव; सुईद्वारे शरीरात सोडले जाणारे औषध ११) शर; तीर १२) गोधडी १३) कड्या असलेले पाणी भरून ठेवण्याचे एक मोठे भांडे १४) दीप; दीपक १५) फांदी; शाखा १६) नमन; सुरुवात; प्रणाम; आरंभ १८) मार्ग; पथ; रस्ता १९) आई; जननी; माय २१) कापड; वस्त्र; वसन २२) कारकीर्द

**उभे शब्द :-** १) पिण्याचे पाणी थंड करण्यासाठी वापरले जाणारे मातीचे भांडे २) अगदी ठणठणीत रिकामे ३) सोळा पायल्या धान्याचे पूर्वीचे एक माप ४) झाडाच्या पानांचा हलताना होणारा आवाज ५) प्रश्नोत्तर ७) छाप; मुद्रा; शिक्का ८) पालनपोषण करणारा; एक पालेभाजी १२) वाळूचे मैदान १५) कुंपणाचा मोठा दरवाजा १७) मुस्लिमांची प्रार्थना १८) अनेक कुटुंबे राहत असलेले मोठे घर २०) कागदाचे चार बंद; ताप; पीडा

**शब्दगंध क्र. ७४५९ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. १२४२ चे उत्तर**



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : जिद्द हीच खरी ताकद आहे, जी माणसाला शून्यातून शिखरावर नेते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### झोपेत पायाला झटका देऊन पडल्यासारखे का वाटते?

झोप लागता-लागता अचानक पायाला किंवा संपूर्ण अंगाला जोरात झटका बसतो आणि खाटेवरून किंवा उंचावरून खाली पडल्यासारखे वाटून आपण दचकून जागे होतो. या प्रकाराला झोपेचा झटका म्हणतात. हा कोणताही आजार नाही. जगातील ७० टक्के लोकांना आयुष्यात कधी ना कधी हा अनुभव येतो. झोपेच्या पहिल्या टप्प्यात आपले स्नायू हळूहळू सैल पडतात, श्वासोच्छ्वास आणि हृदयाचे ठोके मंदावतात. त्याच वेळी मेंदूच्या जागे ठेवणाऱ्या आणि झोप आणणाऱ्या भागात गोंधळ होतो. स्नायू एकदम शिथिल झाले की मेंदूला वाटते आपण खाली पडतोय. मग तो वाचवण्यासाठी सर्व स्नायूंना एकदम आकुंचन पावण्याचा संदेश देतो, त्यामुळे झटका बसतो.

लाखो वर्षांपूर्वी आपले पूर्वज झाडांवर झोपायचे तेव्हा पडू नये म्हणून निसर्गाने केलेली ही एक संरक्षण व्यवस्था आहे. हा झटका येण्यामागे ताण, अति थकवा, झोपेच्या अनियमित वेळा ही मोठी कारणे आहेत. संध्याकाळनंतर चहा, कॉफी, सिगारेट घेतली तर मेंदू उत्तेजित राहतो. शरीर झोपायचा प्रयत्न करते पण मेंदू जागा असतो, या गोंधळात झटका येतो. शरीरात लोह, मॅग्नेशियम, कॅल्शियम किंवा पाणी कमी झाले तरी मज्जातंतू नीट काम करत नाहीत आणि पायात झटके येतात. महिन्यातून एक-दोन वेळा असे झाले तर ते सामान्य आहे. पण रोज रात्री अनेक वेळा झटके येत असतील, झोपमोड होत असेल, दिवसा थकवा वाटत असेल किंवा पाय दुखत असतील तर मात्र वैद्यांना भेटावे. कारण हा अस्वस्थ पायांचा विकार किंवा मज्जातंतूचा त्रास असू शकतो. हे टाळण्यासाठी रोज एकाच वेळी झोपणे आणि उठणे गरजेचे आहे.

दुपारी तीन नंतर चहा, कॉफी, चॉकलेट टाळावे. संध्याकाळी हलके चालणे, योग व पायांचे ताणण्याचे व्यायाम करावेत पण झोपेआधी जड व्यायाम करू नये. झोपेच्या एक तास आधी भ्रमणध्वनी व दूरचित्रवाणी बंद करावा. आहारात पालेभाज्या, केळी, बदाम, खजूर, गूळ यांचा समावेश करावा आणि दिवसाला तीन ते चार लिटर पाणी प्यावे. झोपण्यापूर्वी पायांना कोमट तेलाने चोळावे, गरम पाण्याने अंघोळ करावी आणि दीर्घ श्वसन करावे. थोडक्यात झोपेतील झटका हा मेंदूचा संरक्षण कवच आहे. ताण कमी केला, झोपेच्या वेळा पाळल्या आणि आहार सुधारला की दोन ते तीन आठवड्यात हा त्रास आपोआप बंद होतो. झोप चांगली तर आरोग्य चांगले आणि दिवसही चांगला जातो.

### नम्रतेचे फळ

एका गावात सायली आणि मेघा नावाच्या दोन मैत्रिणी राहत होत्या. दोघींनाही उत्तम चित्रकार व्हायचे होते पण त्यांची वाट वेगळी होती. सायली खूप हुशार होती. तिच्या चित्रांना जिल्ह्यात पहिला क्रमांक मिळायचा. तिने शहरात जाऊन मोठ्या महाविद्यालयात प्रवेश घेतला. तिथे तिने महागडे रंग, कुंचले आणि मोठा कॅनव्हास विकत घेतला. तिच्या प्रदर्शनाला मोठे लोक यायचे. त्यामुळे सायलीला वाटायचे की माझ्याइतकी चांगली कोणीच नाही. ती कोणाचे ऐकत नव्हती, शिक्षकांनी चूक दाखवली तरी रागवायची. मेघा मात्र गावातच राहिली. तिच्याकडे महागडे रंग नव्हते. ती भिंतीवर, फरशीवर, जुन्या वहीत रांगोळी आणि चित्रे काढायची. ती रोज मंदिरात जाऊन देवाच्या मूर्तीसमोर फुले काढायची, लहान मुलांना शिकवायची. तिला बक्षीस मिळो न मिळो, ती आनंदी असायची.

सुरुवातीला सायलीची चित्रे वृत्तपत्रात यायची. लोक तिला कलाताई म्हणायचे. त्यामुळे तिचा गर्व आकाशाला टेकला. ती म्हणायची की मेघा फक्त भिंती रंगवते, तिला कलेतले काय कळते. मेघा मात्र शांतपणे गावातल्या जत्रेसाठी, शाळेच्या भिंतीसाठी चित्रे काढत राहिली. तिने कधीच स्वतःचे नाव मोठ्या अक्षरात लिहिले नाही. सहा महिन्यांत सायलीचे मोठे प्रदर्शन भरले पण तिथे फक्त तिची स्तुती करणारे लोक होते. मेघाच्या चित्रांनी मात्र आख्खे गाव सजले होते. पोरं तिच्या चित्रांवरून हात फिरवून हसायची.

मग एक दिवस गावात मोठी कला स्पर्धा ठरली. विषय होता 'माझे गाव'. परीक्षक मुंबईहून येणार होते. सायलीने शहरातले मोठे रस्ते, उंच इमारती रंगवल्या. तिने विचार केला की हेच खरे चित्र. मेघाने गावातल्या आजीचा सुरकुतलेला चेहरा, नदीवर पाणी भरणाऱ्या बायका, शेतात राबणारा बाप आणि शाळेत हसणारी मुले रेखाटली. तिने खाली कोपऱ्यात छोटसं लिहिले 'गावकऱ्यांना अर्पण'. स्पर्धेच्या दिवशी सायलीचे चित्र बघून सगळे वा वा म्हणाले. पण परीक्षक शांत होते. मेघाचे चित्र पाहिल्यावर एका परीक्षकाच्या डोळ्यात पाणी आले. तो म्हणाला की हे चित्र बोलते आहे. यात गर्व नाही, जिव्हाळा आहे. निकाल लागला तेव्हा मेघाला पहिले बक्षीस मिळाले. तिला राज्य पातळीवर पाठवण्यात आले. सायलीची मान शरमेने खाली गेली. ती मेघाकडे गेली आणि म्हणाली की तुझी कला खरी आहे मैत्रिणी.

मेघा फक्त हसली आणि म्हणाली रंग महाग असला म्हणून चित्र मोठे होत नाही. कारण कलेचा खरा रंग तोच जो दुसऱ्याच्या डोळ्यात आनंद आणतो. हे ऐकून सायलीने ठरवले की आता ती दर महिन्याला गावात येऊन मुलांना मोफत शिकवेल. कारण तिला कळले होते की गर्वाने काढलेले चित्र भिंतीवर टांगले जाते, पण नम्रतेने काढलेले चित्र माणसाच्या मनात कोरले जाते.

बोध : यश, पैसा किंवा बुद्धी कितीही मोठी असली तरी गर्व माणसाला एकटा पाडतो. नम्रता माणसाला मोठे करते.

## आत्मशक्ति



### भोगविलास

जे लोक उत्तम आचरणाने प्रेमयुक्त, प्रामाणिकपणे जीवन जगत, ते दिव्य मंडळात परमेश्वराबरोबर राहतात. ज्या लोकांचे जीवन फार चांगले वा फार वाईट नसे, त्यांना अशा ठिकाणी ठेवले जाई की, तेथे ते पापांचे भोग भोगत आणि पवित्र झाल्यानंतर त्यांना पुढील मंडळात पाठविले जाई. जे लोक दुष्कर्म करतात त्यांना नरकांत पाठविले जाते आणि ते तेथे दुःख भोगतात. त्यांना क्षमा करेपर्यंत दुःखे भोगावी लागतात. अशांचे कुकर्म अतिशय कठीण असल्यास त्यांना माफ केले जात नसे. त्यांनी पश्चात्ताप व्यक्त केला नाही, तर त्यांना नरकात ठेवण्यात येत असे. पुनर्जन्मावर सॉक्रेटिसचा विश्वास होता.जे आत्मे सांसारिक भोगविलासात अडकत असतात, ते नवे शरीर धारण करून ह्या जगात परत येतात, असा त्यांचा विश्वास होता.

ग्रीक देशांत मिस्टेरीज, ह्या नावांचा धर्म होता. तो आपल्या अनुयांना आत्मिक रहस्यांचे ज्ञान देई. त्या धर्मात तत्त्वज्ञ व लेखक लोक सामील असत. धार्मिक रहस्ये जाणण्यासाठी ते एथेन्स शहराजवळील 'एल्यूसिस' ह्या केंद्रात जात. त्यांचे अनुयायी मानीत की, आत्मा काही दिवस मानव शरीरात राहतो, नंतर काही दिवस प्रकाशाच्या देशात राहतो व पुनः मानव रुपाने जन्म घेतो. प्रकाश, रंग-रुपाशिवाय असू शकतो किंवा मानव शरीर धारण करू शकतो. मृत्यु आत्म्याची ह्या संसारी जीवनातून सुटका करतो व त्याला अधिक चांगल्या आणि सुखी जगात जाता येते. आत्मा सांसारिक सुखात गुंतला असेल तर तो पुन्हा ह्या जगात परत येतो. जर तो पवित्र बनला तर उच्चतम मंडळात कायमचा जाऊ शकतो.

प्लेटो एका ठिकाणी म्हणतात, ह्या धर्माची दिव्य दीक्षा घेतल्यावर, आम्हाला संपूर्ण दिव्य दृश्ये दिसू लागतात व आम्ही निर्मळ अशा ज्योतिर्मय जगात राहु लागतो.

हिंदू लोकसुध्दा आत्म्याला अमर समजतात. आत्मा एका जीवनातून दुसऱ्या जीवनात प्रवेश करतो. गेल्या जन्मात केलेल्या कर्माचा भोग भोगण्यासाठी आत्मा परत जन्म घेतो. काया, वाचा, मनाने व इतर कार्याद्वारा केलेली कर्मे एकत्र साचले जातात.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### त्यांची सामाजिक कार्ये

मी आणि ती व्यक्ती एकाच पित्याचे दोन प्रेम स्वरूप आत्मे आहोत अशा दृश्याची कल्पना मी केली आणि त्या व्यक्तीला सकारात्मक तरंग पाठवला. थोड्या वेळाने, या अति महत्त्वाच्या व्यक्तीच्या पुढच्या खुर्चीत बसलेल्या व्यक्तीने माझी त्यांच्याशी ओळख करून दिली. मी त्यांना सांगितलं की मी अभिवादन केलं पण त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. यावर ती अति महत्त्वाची व्यक्ती म्हणाली, तुम्ही मला ओळखत असाल, पण मी तुम्हाला ओळखत नाही मग मी कसा काय प्रतिसाद देणार? अभिनेता होण्याच्या माझ्या प्रवासात मी अनेकदा अपमानित झालो आणि ही तर एक छोटीशी घटना होती.

तुम्हालासुरेश ओबेरॉय : यावर मी म्हणालो, तुम्ही मला ओळखत नसाल पण मी ओळखतो. मी त्यांना सांगितलं की, मी तुमच्याबद्दल खूप वाचलं आहे, तुमच्या सामाजिक कार्याने मी प्रभावीत झालो आहे आणि तुम्ही खूप चांगलं काम करत आहात. यावर त्यांनी प्रतिसाद दिला, तुम्हीही काही कमी नाही आहात. तुम्ही शिवानीदीदींबरोबर 'अवेकनिंग विथ ब्रह्मकुमारीज' या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करत आहात. त्याचा अनेक लोकांना खूप फायदा होत आहे.

हे ऐकून मी विस्मयचकित झालो. एका मिनिटापूर्वी ह्या व्यक्तीने माझी दखल घ्यायलासुद्धा नकार दिला होता. पण नंतर आम्ही एकमेकांचे चांगले मित्र बनलो आणि तो विषय तिथेच संपला.

शिवानीदीदी : विषय तिथेच संपला नाही. एका नवीन नात्याची सुरुवात झाली.

सुरेश ओबेरॉय : त्या व्यक्तीबरोबर नाही तर माझी स्वतःबरोबर एका नवीन नात्याची सुरुवात झाली.

शिवानीदीदी :

तुम्ही असं काहीतरी केलं जे तुम्हाला पूर्वी खूपच अवघड आणि अशक्य वाटत होतं. ज्यांनी तुमच्याकडे दुर्लक्ष केलं त्यांच्याशी बोलणं किती अवघड होतं ?

सुरेश ओबेरॉय : अहंकारी माणसासाठी हे खूपच अवघड असतं.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : अहो, आपल्या लग्नाला १० वर्ष झाली. काही गिफ्ट देणार का?
नवरा : अगं, मी तर तुझ्यासाठी रोजच उपवास करतो...
बायको : काय सांगता, खरंच?
नवरा : हो, कारण तू जेवण बनवलंस की माझा उपवास आपोआप घडतो.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ भारतरत्न पुरस्काराने सन्मानित पहिली महिला कोण?

– इंदिरा गांधी

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### पुदिना

या रोपांना एक विशिष्ट असा सुगंध असतो. पुदिन्याला मराठीत पुदिना, संस्कृतमध्ये पूतिहा, इंग्रजीत फिल्डमिंट, तर शास्त्रीय भाषेमध्ये मेन्था व्हिरिडिस या नावाने ओळखले जाते. तो लॅबियाटी या कुळातील आहे.

औषधी गुणधर्म :

आयुर्वेदानुसार : पुदिना हा दीपक, पाचक, रुचकर, स्वादप्रिय, हृदय, उष्ण, वात व कफदोषहारक व कृमीनाशक आहे.

आधुनिक शास्त्रानुसार : पुदिन्यामध्ये कॅल्शिअम, लोह, फॉस्फरस, क, ड व ई जीवनसत्त्वे भरपूर प्रमाणात असतात; तर ब जीवनसत्त्व अत्यल्प प्रमाणात असते. त्याचबरोबर प्रथिने, आर्द्रता, खनिजे, तंतुमय व पिष्टमय पदार्थ या सर्व गुणांनी परिपूर्ण असलेला पुदिना आरोग्य चांगले राखण्यासाठी उत्तम आहे. असे म्हणतात, की ज्याच्या घरामध्ये कायम पुदिन्याचा वास आहे, त्याच्या घरामध्ये सर्दी-खोकला हे आजार वाऱ्यालाही उभे राहत नाहीत. त्याचे औषधी गुणधर्म नक्कीच शरीराला लाभदायक आहेत. म्हणून प्रत्येकाने घराघरांतून तुळशीप्रमाणेच पुदिना लावला पाहिजे.

उपयोग :

३) पुदिना हा दीपक, पाचक असल्याने तो अपचन, आम्लपित्त, उलटी, मळमळ या विकारांवर उपयुक्त आहे. सकाळ-संध्याकाळ एक-एक चमचा पुदिना रस घेतल्याने पचनक्रिया सुधारून वरील विकार दूर होतात.

२) पुदिना कृमीनाशक असल्याने लहान मुलांना जर जंत झाले असतील, तर त्यांना एक चमचा पुदिना

३) रस दोन वेळा द्यावा. पोटदुखीचा त्रास होत असेल, तर अशा वेळी पुदिन्याचा रस एक चमचा आणि आल्याचा रस एक चमचा घेऊन त्यात चिमूटभर हिंग व सैंधव घालून ते प्यावे. याने पोटदुखी निश्चितच थांबते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# तरुणाईला अंमली पदार्थांच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा प्रयत्नशील : कृष्णराज महाडिक

नगर – तरुणाई अंमली पदार्थांच्या आहारी जात आहे. त्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गांभीर्याने कारवाईचे निर्देश दिलेले आहेत. तसेच भाजपा युवा मोर्चाच्या माध्यमातून गृह विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन प्रत्येक पोलिस ठाण्यात एक नोडल अधिकारी नियुक्त करण्याची मागणी केली आहे. तरुणाईला अंमली पदार्थांच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी शाळा–महाविद्यालयांवर व परिसरावर विशेष लक्ष भाजप युवा मोर्चा ठेवत आहे, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी दिली.



भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक हे नगर शहरात आल्यावर युवा मोर्च्याच्या वतीने त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष ऋद्रेश अंबाडे, कैलास गर्जे, सुजय मोहिते, संजय गायकवाड, अमोल निस्ताने, आदींसह पदाधिकारी.

कृष्णराज महाडिक हे गुरवारी नगर दौऱ्यावर आले होते. त्यानिमित्ताने युवा मोर्च्याच्या वतीने शहरत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयातील पालकमंत्री संपर्क कार्यालयात त्यांनी पत्रकारांशी संवाद साधाल. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, जिल्हाध्यक्ष ऋद्रेश अंबाडे, जिल्हा सरचिटणीस निखिल वारे, सरचिटणीस कैलास गर्जे, कृष्णा राजळे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

महाडिक म्हणाले की, युवा मोर्चाच्या युवा शक्ती जागर यात्रेच्या माध्यमातून राज्यातील युवकांचे प्रश्न जाणून घेतले जात आहेत. या यात्रेदरम्यान युवा उद्योजकांच्या भेटी, देवस्थानांची व शिवकालीन किल्ल्यांसह कृषी उत्पन्न बाजार समिती, एमआयडीसी कार्यक्षेत्रात भेटी देत आहोत. विशेषतः युवकांशी संवाद साधून त्यांचे प्रश्न व समस्या समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहेत. युवकांच्या प्रश्नांची निवेदने स्वीकारून त्याचा राज्य शासनाकडे पाठपुरावा केला जात असल्याचे ते म्हणाले. राज्य क्रीडा हब बनावे, यासाठी केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या माध्यमातून पायाभूत सुविधा उभारणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

'कॉक्रोच' युवकांमध्ये संभ्रम निर्माण करणारी आळशी लोकांची आभासी पार्टी आहे. त्यामुळे त्यास गांभीर्याने घेण्याची गरज नाहीये. आता कॉक्रोच पक्षाला युवकांकडून अल्प प्रतिसाद मिळत आहे. सोशल मीडियावर पेज काढून पक्ष चालत नाही, त्यासाठी ग्राउंड लेव्हलला काम करावे लागते, असा टोला महाडिक यांनी लावला. युवा जागर यात्रेदरम्यान युवकांशी संवाद साधताना रोजगाराच्या अडचणींबाबत खूप गाऱ्हाणे ऐकली. एमआयडीसीतील उद्योजकांशी संवाद साधला असता, मोठ्या प्रमाणात कौशल्यपूर्ण कर्मचारी मिळत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. यात्रा संपल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याशी चर्चा करून युवांना कौशल्य आधारित प्रशिक्षण देण्यावर भर असेल, तसेच प्रत्येक तालुक्यात शासनाच्या माध्यमातून रोजगार मेळावा घेण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे ते म्हणाले. समाजसेवक अण्णा हजारे यांची राळेगणसिद्धी येथे पहिल्यांदाच भेट घेतली. त्यांच्यातील सकारात्मकता व नम्र स्वभाव प्रेरणादायी आहे. त्यांच्या भेटीतून खूप काही शिकण्यास मिळाल्याचे महाडिक यांनी सांगितले.

प्रारंभी युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष ऋद्रेश अंबाडे यांनी स्वागत केले. या वेळी सरचिटणीस महेश नामदे, केडगाव मंडल अध्यक्ष भरत ठुबे, अमोल निस्ताने, सचिन वायकर, अनिकेत निंबाळकर, विजय गायकवाड, मुकुल गंधे, अशोकराव गायकवाड, संजय गायकवाड आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

कृष्णराज महाडिक हे प्रथमच नगर शहरात आल्याने यांचे नगर शहरात जल्लोषात स्वागत करण्यात आले. केडगाव येथे नगरसेवक सुजय मोहिते यांनी महाडिक यांचे स्वागत करून त्यांच्या हस्ते शाळेतील विद्यार्थ्यांना खेळाच्या साहित्यांचे वाटप केले. तसेच जुन्या बस स्थानक जवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ युवा मोर्चाच्या वतीने त्यांचे स्वागत ढोल ताशांच्या गजरात व फटाक्यांची आतिश बाजी करून पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन करून कृष्णा महाडिक यांनी ग्रामदैवत विशाल गणपती मंदिरातही गणपतीची आरती केली.

# प्रेरणादायी अक्षरधन

## परोपदेशे पांडित्यं

“मुसाफिर”

संकलन: दिशान फिचर्स




नेहमी खरे बोलावे, सदा सन्मार्गाने चालावे. हे फक्त दुसऱ्याला सांगावे. स्वतः तसे मुळी न वागावे. यातच मोठेपण मिरवावे. पण याला काय माणूस म्हणावं?

जगात मोठमोठी जीवन तत्त्वे आहेत. नीतिमुल्ये काय कमी आहेत? मला तर ती पाठ आहेत. धडाधड ऐकवतो दुसऱ्यांना. केवढा विद्वान वाटतो मी त्यांना. म्हणतात, यालाच नरशार्दूल म्हणा. यालाच एकमेव गुरू माना. पण ते कुठे जाणतात की, त्याप्रमाणे सांगणारे स्वतः तसे वागत नसतात. मी कुठे वागतो तसे? पण त्यांना ते कळणार कसे ? बोलल्याप्रमाणे चालणारा दिसतच नसतो. उपदेशानुसार वागायला केवढे धैर्य लागते स्वार्थत्यागाची गरज असते. आपल्या फायद्यावर पाणी सोडावे लागते.

उपदेशकाचा आव आणायचा. मनात स्वार्थीभाव नांदायचा। विषयोपभोगात तो सदा गुंतायचा. असा संत कोणत्या कामाचा? पण या कलियुगात अशांचाच सुळसुळाट व्हायचा। जे बोलायचे त्याच्या उलट वागायचे।

एक जण लोकल्याणाचे मार्ग जाणतो. ते चांगले अभ्यासतो. लोकांत जाऊन राहतो. पण ज्यांच्याकडे वस्ती करतो. त्यांच्या वस्तू चोरतो. काय 'चाटायचे मग त्याच्या त्या ज्ञानाला ? तो करतोय त्या अभ्यासाला ? लोककल्याण जाणणाराच हानी पोहचवितो लोकांना.

कुणी तरी त्याचे ढोंग फार काळ चालू देणार नाही. त्याचे पितळ उघडे पडल्याशिवाय राहणार नाही. ठगाला वठणीवर आणणारा कधी तरी भेटतोच. संत तुकारामांची ही गोष्ट पाहा ना.

देहू गावात एकदा एक बुवा आला. सगळा गाव त्याच्या नादी लागला. म्हणे तो नावाजलेला बुवा अंतर्ज्ञानी होता. दडलेले गुप्त धन सांगू शकत होता. गावात सगळीकडे बातमी पसरली, की बुवामुळे अनेकांना गुप्तधनप्राप्ती झाली. मग लोकांनी बुवाकडे गर्दी होऊ लागली. बुवाला प्रचंड दक्षिणा मिळू लागली. जनता बुवाच्या पायाला हात लावायला धडपडू लागली. खूप दक्षिणा गोळा झाली. बुवाबाजी आणखी वाढली.

तुकाराम महाराज देखील त्याच्या दर्शनाला म्हणून त्या गर्दीत शिरले. कसेबसे बुवापर्यंत पोहोचले. बुवा होते डोळे मिटून बसले. तुकोबांनी त्याच्यासमोर आपले आसन ठोकले, पण बुवा डोळे उघडेचनात. गावातले भक्तदेखील उतावीळ झाले. अर्ध्या तासाने बुवांनी डोळे उघडले. तुकाराम महाराज त्यांच्याकडे एकटक पाहत होते. मनात काही योजत होते. तितक्यात त्या बुवाने तुकाराम महाराजांकडे पाहिले आणि विचारले, तुकोबा आपण इथे केव्हा आलात?

तुकाराम महाराज म्हणाले, 'तुम्ही डोळे मिटून विचार करीत होतात ना, की बरं मूर्ख गाव हाती लागलं.'

तुकोबाची वाणी सगळी गर्दी ऐकत होती. बुवा घाबरले. रात्रीच गाव सोडून निघून गेले।

बोलण्यापेक्षा करणे बरे। करणाऱ्याचे वजनदार बोलणे ।।

– **किशोर गांधी**

# महिला व व्यवसाय, उद्योजकांसाठी दिल्लीगेटला ३, ४ व ५ जुलैला प्रदर्शन

नगर – प्रतिबिंब संस्थेच्या वतीने अधिकन उद्योजकता वाढविण्यासाठी व छोटे व्यावसायिक, उद्योजकांच्या सक्षमीकरणा साठी प्रदर्शन आयोजित केले असून ज्यात छोट्या व्यावसायिकांना तसेच मध्यम व्यवसायिकांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येत आहे. ३, ४ व ५ जुलै रोजी प्रदर्शन शमी गणपती कार्यालय, दिल्लीगेट, अहिल्यानगर येथे सकाळी १० ते रात्री १० यावेळेत सर्वासाठी खुले असणार आहे. यामध्ये विविध प्रकारचे सुमारे ३० स्टॉलचे नियोजन आहे. सर्व व्यावसायिक, गृह उद्योजक या प्रदर्शनातील स्टॉलमध्ये सहभागी होऊ शकतात.

स्टॉलची बुकिंग करण्यासाठी व अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क करावा, स्टॉल बुक करण्याची अंतिम तारीख १ जुलै आहे. संपर्क–प्रतिबिंब संस्था ९२८४९३०६७४, अनुजा कांबळे ९८५०२६२५९५, जयश्री सूळ ९८९०६१५०००, ऋतुजा धोत्रे ९४०५१०१३५६, प्रिया भागवत ८८३०६५६८३४.

# नगरमध्ये २८ जूनला लता मंगेशकरांच्या व्यक्तिमत्त्वावर आधारित 'विशेष व्याख्यान आणि तेलुगू सांस्कृतिक कार्यक्रमा'चे आयोजन

नगर – महाराष्ट्र राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत



महाराष्ट्र राज्य तेलुगु साहित्य अकादम 'च्या वतीने भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंवर आधारित विशेष व्याख्यान आणि तेलुगू सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम २८ जून रोजी सायंकाळी ५.३० वाजता नालेगाव येथील श्री मार्कंडेय संकुल, अमरधाम रोड, दातरंगे मळा येथे होणार आहे.

या कार्यक्रमात 'लता मंगेशकर, संगीताची सरस्वती' या गाजलेल्या पुस्तकाचे लेखक श्री कस्तुरी मुरलीकृष्ण यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले असून, लता मंगेशकर यांच्या संगीत कारकिर्दीचा, त्यांच्या संगीतातील योगदानाचा तसेच भारतीय संगीतविश्वावर त्यांनी उमटविलेल्या अमिट ठशाचा सखोल आढावा ते उपस्थितांसमोर तेलगु भाषेत मांडणार आहेत. याशिवाय तेलुगू संस्कृतीचे दर्शन घडविणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रमही सादर करण्यात येणार आहेत. या मध्ये भरतनाट्यम, बतकम्मा, कोलालू आणि मंगळा गौर या कला सादर होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार तसेच सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

कार्यक्रमाचे समन्वयक अशोक कंटे यांनी सांगितले की, भारतरत्न लता मंगेशकर यांचे कार्य हे केवळ संगीत क्षेत्रापुरते मर्यादित नसून ते भारतीय संस्कृतीचा अमूल्य वारसा आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू जाणून घेण्याची ही संधी आहे. तसेच तेलुगू संस्कृतीची समृद्ध परंपरा अनुभवण्याची संधीही या कार्यक्रमातून मिळणार आहे. तेलुगू भाषेतील व तेलुगू समाजातील साहित्य, संगीत आणि संस्कृतीप्रेमी नागरिकांनी तसेच तेलुगू समाजबांधवांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्थानिक समन्वयिका सौ. सुरेखा भिमराज कोडम यांनी केले आहे.

कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून साहित्य, संगीत व सांस्कृतिक क्षेत्रातील रसिकांसाठी हा कार्यक्रम विशेष आकर्षण ठरणार आहे.

# भाऊसाहेब फिरोदियाच्या गुंजनचा दहावीत 'परफेक्ट १०० टक्के'चा मान

## दहावीच्या २०२५-२६ बॅचमध्ये जिल्ह्यात ठरली एकमेव विद्यार्थिनी

नगर – महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलची विद्यार्थिनी गुंजन महेश गोले हिने दहावीच्या परीक्षेत अखेर शंभर टक्के गुण प्राप्त करून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. प्रारंभी ९९.४० टक्के गुण मिळाल्यानंतर फोटो कॉपी तपासणी व पुनर्मूल्यांकनाच्या प्रक्रियेनंतर तिच्या गुणांमध्ये वाढ होत अखेर तिला १०० टक्के गुण मिळाल्याचे अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आले. या यशामुळे ती अहिल्यानगर जिल्ह्यात शंभर टक्के गुण मिळवणारी एकमेव विद्यार्थिनी ठरली आहे.



भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलची विद्यार्थिनी गुंजन महेश गोले हिने दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के गुण प्राप्त करून नवा विक्रम प्रस्थापित केल्याबद्दल तिचा अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने पालकांसह सत्कार करताना संस्थेच्या प्रमुख श्रीमती छायाताई फिरोदिया आदी.

गुंजनच्या या अभूतपूर्व यशाबद्दल अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने तिचा विशेष सत्कार करण्यात आला. संस्थेच्या प्रमुख छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते तिचा गौरव करण्यात आला. यावेळी संस्थेचे खजिनदार प्रकाश गांधी, मुख्याध्यापक कैलास साबळे, महेश वसंत गोले, अंजली गोले, प्रमोद गांधी आदी उपस्थित होते.

दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर गुंजनला ९९.४० टक्के गुण मिळाले होते. गुणवाढीची शक्यता लक्षात घेऊन उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती मागविण्यात आल्या. त्यानंतर झालेल्या तपासणीत तिचे गुण वाढून ९९.८० टयांवर पोहोचले. मात्र, यानंतरही तिच्या पालकांनी संबंधित विषयांच्या गुणांचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. अखेर पुनर्मूल्यांकन प्रक्रियेनंतर तिच्या गुणांमध्ये आणखी वाढ होऊन तिला १०० टक्के गुण मिळाल्याचे नुकतेच कळविण्यात आले.

पुणे विभागातून यंदा सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली होती. या सर्व विद्यार्थ्यांम धून केवळ बारा विद्यार्थ्यांना शंभर टक्के गुण मिळविण्याचा मान मिळाला आहे. त्यामध्ये गुंजन गोलेचा समावेश असून, तिच्या या यशामुळे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलसह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचा शैक्षणिक सन्मान उंचावला आहे.

गुंजनच्या यशामागे तिची जिद्द, कष्ट, कुटुंबाचे आणि शिक्षकांचे मोठे योगदान असल्याचे स्पष्ट करुन छायाताई फिरोदिया यांनी तिचे विशेष कौतुक केले. तिचे वडील महेश गोले हे व्हीआरडीईमध्ये अधिकारी म्हणून कार्यरत आहेत, तर आई अंजली गोले या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये शिक्षिका आहेत. घरातील शैक्षणिक वातावरण, नियमित अभ्यास, शिस्तबद्ध दिनचर्या आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या बळावर तिने हे यश संपादन केले.

गुंजनच्या या यशाबद्दल संस्थेचे सहकार्यवाह गौरव फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, विश्वस्त ॲड. गौरव मिरीकर यांच्यासह विश्वस्त मंडळातील सदस्यांनी तिचे अभिनंदन केले. तसेच भविष्यातील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# कौशल्य विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून एकल महिलांच्या सक्षमीकरणाला प्राधान्य

## समिती सदस्य विनायक देशमुख



नगर – केंद्र व राज्य सरकारच्या कौशल्य विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून एकल महिला सक्षमीकरणाला विशेष प्राधान्य दिले जाणार आहे, अशी माहिती कौशल्य विकास समितीचे कार्यकारी सदस्य विनायक देशमुख यांनी दिली.

राज्य शासनाने राज्यातील एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी विशेष धोरण तयार करण्याचा निर्णय घेतला असुन त्यादृष्टीने सर्व स्तरांवर कामाला सुरुवात झाली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांच्या संकल्पनेतून व त्यांच्या पुढाकाराने एकल महिला सक्षमीकरणासाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एकल महिला सक्षमीकरण समिती स्थापन करण्यात आली असून त्यामाध्यमातून शासनाच्या विविध विभागांच्या योजनांमध्ये एकल महिलांना प्राधान्य दिले जात आहे. मागील वर्षी जिल्ह्यातील एक हजार पेक्षा जास्त एकल महिलांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देण्यात आले. सध्या या महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या असून प्रति महिना किमान दहा हजार ते कमाल एक लाख रुपये पर्यंत इतके अर्थार्जन करीत आहेत.

या आर्थिक वर्षाचा कौशल्य विकास कार्यक्रमाचा आराखडा निश्चित होत असुन या कार्यक्रमांतर्गत एकल महिलांना प्रशिक्षणात प्राधान्य दिले जाणार आहे. ना. राधाकृष्ण विखे पा. यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र व राज्य सरकारच्या कौशल्य विकास योजनांसह खाजगी आस्थापनांच्या सी.एस.आर. निधीतुन एकल महिलांना कायम स्वरुपी उत्पन्नाचे साधन निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या एकल महिलांनी एकल महिला सक्षमीकरण समितीशी संपर्क साधावा, असे आवाहन विनायक देशमुख यांनी केले आहे.

# 'श्रुती निकेतन'च्या विद्यार्थ्यांचे संगीत परीक्षांमध्ये उज्वल यश

## डॉ.रुपाली कुलकर्णी यांना संगीत विशारद ही पदवी प्राप्त

नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या वतीने घेण्यात



आलेल्या एप्रिल २०२६ च्या संगीत परीक्षेत श्रुती संगीत निकेतनच्या विद्यार्थ्यांनी यशाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. अहिल्यानगर (९९) या केंद्रात सुप्रिया जाधव, अनुप्रिता सोनवणे, वरद कुलकर्णी, अन्वय परदेशी, स्वराली गवारे, रेणुका कुलकर्णी, आर्या कुलकर्णी, ऋतुजा कालिया, डॉ.रुपाली कुलकर्णी हे विद्यार्थी विविध परीक्षांमध्ये गायनात व हार्मोनियम वादनात केंद्रात प्रथम आले आहेत.

डॉ.रुपाली कुलकर्णी यांनी प्रथम श्रेणीसह संगीत विशारद ही परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

परीक्षा निहाय निकाल पुढीलप्रमाणे : प्रारंभिक – अवनी आघाव, पूनम आगरकर, श्रेया खासगीवाले, सुप्रिया जाधव, देवांशी सोनवणे, अनुप्रिता सोनवणे, ऋतुजा साळुंके

प्रवेशिका प्रथम – अन्वय परदेशी, शराली काळे, रोहिणी कुऱ्हाडे, मनिषा तळेकर, आरोही दगडे, तन्मय पडोळे, शांभवी साखला, वरद कुलकर्णी, सोहम सूर्यपुजारी, मैत्रेयी ढवण, श्रीकर ढवण, उर्वी जोशी, वसुधा म्हस्के

प्रवेशिका पूर्ण – कृष्णा खराडे, भार्गवी परदेशी, सई मुळे, गिरीश दैतुल, स्वराली गवारे, स्वरा चाकूरकर, प्रगल्भ जोशी, रोहित तांबोळी, अनुश्री तळेकर, कृष्णा साखला

मध्यमा प्रथम .. रेणुका कुलकर्णी, साक्षी दराडे., मध्यमा पूर्ण : स्वराली जोशी, आर्या कुलकर्णी., विशारद प्रथम : ऋतुजा कालिया., विशारद पूर्ण : डॉ.रुपाली कुलकर्णी

सर्व विद्यार्थ्यांना प्रतीक्षा काळे, डॉ.धनश्री खरवंडीकर आणि मकरंद खरवंडीकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# कथक ही केवळ कला नव्हे, तर संस्कार आणि व्यक्तिमत्त्व घडविणारी जीवनसाधना

## प्रिया ओगले–जोशी यांचे प्रतिपादन; अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या कथक परीक्षेत 'नृत्यझंकार'चा यशाचा झंकार; ३८ विद्यार्थिनींना विशेष योग्यता



अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या कथक परीक्षेत 'नृत्यझंकार'३८ विद्यार्थिनींना विशेष योग्यता प्राप्त झाली.

नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या कथक नृत्याच्या विविध स्तरावरील परीक्षांमध्ये नृत्यझंकार डान्स स्कूलच्या विद्यार्थिनींनी नेत्रदीपक यश संपादन करत अहिल्यानगर केंद्रात मानाचे स्थान पटकावले आहे. पहिली ते पाचवी या विविध स्तरांच्या परीक्षांमध्ये तब्बल ३८ विद्यार्थिनींनी विशेष योग्यता (डिस्टिंक्शन) प्राप्त केली असून सर्वच स्तरांवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे नऊ विद्यार्थिनींनी पैकीच्या पैकी गुण मिळवत उत्कृष्टतेचा नवा मानदंड निर्माण केला आहे.

प्रारंभिक (प्रथम वर्ष) परीक्षेत रेणुका दहातोंडे, वर्षा चांडाळे, शीतल शेळके, सृष्टी धामणे, स्माईली परदेशी, सिद्धी घोडेस्वार, गायत्री बेल्हेकर आणि अन्विता कुलकर्णी यांनी विशेष योग्यता मिळवली, तर दिविजा कापसे हिने प्रथम क्रमांक पटकावत केंद्रात मानाचे स्थान मिळवले.

प्रवेशिका पूर्ण (द्वितीय वर्ष) परीक्षेत नमिता फिरोदिया, युगंधरा घुले आणि धनश्री गाडे यांनी यश संपादन केले. यामध्ये धनश्री गाडे हिने द्वितीय क्रमांक मिळवला. गौरी तांबे, अन्वी हापस, खुशबू मेश्राम आणि जान्हवी अकुबतीन यांनीही उत्कृष्ट कामगिरी करत यशाची परंपरा कायम राखली. जान्हवी अकुबतीन हिने तृतीय क्रमांक पटकावला.

प्रवेशिका प्रथम परीक्षेत डॉ. भक्ती क्षीरसागर यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच सानवी दुगम, रिया गवळी, सानवी भोर आणि सार्थिका पानसरे यांनी तृतीय क्रमांक मिळवत संस्थेच्या यशात भर घातली.

मध्यमा पूर्ण (पाचवे वर्ष) परीक्षेत सई गर्जे हिने प्रथम क्रमांक, समृद्धी खिस्ती हिने द्वितीय क्रमांक तर मनस्वी गंधे हिने तृतीय क्रमांक मिळवून नृत्यझंकारच्या यशाचा झेंडा उंचावला.

यशस्वी विद्यार्थिनींना नृत्यझंकार डान्स स्कूलच्या संचालिका तथा कथक नृत्यगुरू प्रिया ओगले–जोशी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी प्रिया ओगले–जोशी म्हणाल्या, कथक ही केवळ नृत्यकला नसून ती भारतीय संस्कृती, परंपरा आणि मूल्यांचे जतन करणारी साधना आहे. विद्यार्थिनींनी वर्षभर अत्यंत मेहनतीने सराव केला. त्यांच्या जिद्दीमुळे आणि कलेप्रती असलेल्या समर्पणामुळे हे यश मिळाले आहे. प्रत्येक विद्यार्थिनीच्या यशामागे तिची मेहनत आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. या निकालामुळे नृत्यझंकार परिवाराचा गौरव वाढला आहे. त्या पुढे म्हणाल्या, आजच्या स्पर्धात्मक युगात कला विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, संयम आणि सकारात्मक विचार देण्याचे काम करते. कथकच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच संस्कारांचे संवर्धन होते. भविष्यात अधिकाधिक विद्यार्थ्यांना शास्त्रीय नृत्याकडे आकर्षित करून त्यांना राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर घडविण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. विद्यार्थिनींच्या या यशामुळे आणखी जोमाने कार्य करण्याची प्रेरणा मिळाली आहे. लहान मुलांपासून ते महिलांपर्यंत विविध वयोगटातील विद्यार्थ्यांचा या परीक्षांमध्ये सहभाग होता. त्यामुळे नृत्यझंकार डान्स स्कूल हे केवळ नृत्य शिकविणारे केंद्र नसून कला, संस्कार आणि आत्मविश्वास घडविणारे व्यासपीठ म्हणून ओळखले जात आहे.

प्रिया ओगले–जोशी या अहिल्यानगरमधील पहिल्या कथक नृत्य विशारद म्हणून परिचित आहेत. गेल्या २५ वर्षांपासून त्या कथक नृत्याच्या प्रचार आणि प्रसारासाठी कार्यरत असून सावेडी व शहरातील दोन केंद्रांमधून शेकडो विद्यार्थ्यांना त्यांनी प्रशिक्षण दिले आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या एनआयसीयू विभागात नवजात बालकांसाठी सर्व अद्ययावत सेवा उपलब्ध

## डॉ. निखिलकुमार गुट्टे यांचे प्रतिपादन; बालकांची मोफत आरोग्य तपासणी; ५५ बालकांची मोफत तपासणी



जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत बालरोग तपासणी शिबिराच्या दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना डॉ. निखिलकुमार गुट्टे आदी.

नगर – लहान बालकांच्या आरोग्यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अद्यावत एनआयसीयू सेंटर कार्यान्वित असून, तज्ञ व अनुभवी डॉक्टरांची टीम सेवा देत आहे. २६ बेडच्या अद्यावत एनआयसीयू विभागात नवजात बाळाच्या विविध आजारावर सर्व अद्यावत सेवा उपलब्ध असून, हे सेंटर जिल्ह्यातील बालकांसाठी संजीवनी ठरत असल्याचे प्रतिपादन नवजात शिशू व बालरोग तज्ज्ञ डॉ. निखिलकुमार गुट्टे यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत बालरोग तपासणी शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी डॉ. गुट्टे बोलत होते. यावेळी संतोष बोथरा, डॉ. वसंत कटारिया, डॉ. प्रकाश कांकरिया, बाबुशेठ लोढा, अभय गुगळे, माणक कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, प्रकाश छल्लाणी, डॉ. आशिष भंडारी, पेडियाट्रीक सर्जन डॉ. रूपेश सिकची, बालरोग तज्ज्ञ डॉ. वैभवी वंजारे, डॉ. दिपी अग्रवाल, डॉ. लिझा बलसारा आदी उपस्थित होते.

पुढे डॉ. गुट्टे म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये नवजात बाळाच्या श्वासोच्छवासाच्या त्रासावर उपचार, बालदमा ए.आर.डी.एस. (श्वसनदाह), नवजात बालकांच्या कावीळीसाठी फोटोथेरपी व रक्त बदलण्याची सुविधा, अनुवंशिक आजार, जन्मजात आजारांचे निदान व उपचार, बालदमा तसेच लहान मुलांचे टू डी इको, एक्स रे, पॅथोलॉजी लॅब व डायलिसिस मशीन द्वारे सेवा उपलब्ध आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत शस्त्रक्रिया सुविधाही उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी दिली.

बालरोग तज्ञ डॉ. वैभवी वंजारे म्हणाल्या की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये तज्ञ व अनुभवी डॉक्टरांच्या माध्यमातून नवजात बालकांपासून लहान मुलांच्या सर्व शस्त्रक्रिया यशस्वी केल्या जात आहे. प्रदीर्घ अनुभवी डॉक्टर पूर्णवेळ हॉस्पिटलमध्ये कार्यरत आहे. या शस्त्रक्रिया सवलतीच्या दरात केल्या जात असून, महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत लाभ देखील लाभार्थींना दिला जात आहे. तसेच नवजात बालकांना शासकीय लसीकरण व्यतिरिक्त इतर महाग असलेले लसीकरण अल्पदरात ना नफा, ना तोटा या तत्त्वावर उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. दिपी अग्रवाल यांनी देखील हॉस्पिटल मधील विविध अद्यावत सोयी-सुविधांची यावेळी माहिती दिली.

प्रास्ताविकात डॉ. आशिष भंडारी यांनी आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये नवजात बालकांपासून ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या विविध आरोग्य सुविधांचा आढावा घेतला. या शिबिरात ५५ बालकांची मोफत तपासणी करण्यात आली. या शिबीरातील गरजू बालकांवर सवलतीच्या दरात सरकमसीजन (सुंता), हायड्रोसिल, पेंडिक्स, जांघेचा हर्निया, बेंबीचा हर्निया या शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.



विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डच्या चेअरमन डॉ. ईशा अग्रवाल आणि प्रेसिडेंट डॉ. दीपक हरके यांनी लेह येथील महाबोधी इंटरनॅशनल मेडिटेशन सेंटरचे संस्थापक वेन भिक्खू संघसेना यांना विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र प्रदान केले.

# लेह-लडाख येथील महाबोधी इंटरनॅशनल मेडिटेशन सेंटरला वर्ल्ड रेकॉर्डचा सन्मान

नगर – लेह, लडाख : जगातील सर्वात उंच योग स्थळांपैकी एक असलेल्या नुब्रा व्हॅलीतील सियाचिन बेस कॅम्प येथे प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या इंटरनॅशनल फेस्टिव्हल ऑफ योग अँड मेडिटेशन २०२६ या उपक्रमाची नोंद विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये करण्यात आली आहे.

महाबोधी इंटरनॅशनल मेडिटेशन सेंटरचे संस्थापक व आध्यात्मिक संचालक वेन भिक्खू संघसेना यांच्या मार्गदर्शनाखाली, आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त १९ जून रोजी भारतीय सैन्याच्या सहकार्याने समुद्रसपाटीपासून सुमारे १२,००० फूट उंचीवर असलेल्या सियाचिन बेस कॅम्प, नुब्रा व्हॅली येथे योग व ध्यान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या ऐतिहासिक उपक्रमाबद्दल विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डच्या चेअरमन डॉ. ईशा अग्रवाल आणि प्रेसिडेंट डॉ. दीपक हरके यांनी लेह येथील महाबोधी इंटरनॅशनल मेडिटेशन सेंटरचे संस्थापक व आध्यात्मिक संचालक वेन भिक्खू संघसेना यांना विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र प्रदान केले. या प्रसंगी ब्रह्माकुमारी उषा दीदी, सियाचिन बेस कॅम्पचे कमांडर कर्नल मुकेश पांडे, तसेच बेंगळुरूस्थित 'श्वास योग संस्थान'चे संस्थापक आणि आध्यात्मिक गुरु स्वामी वचनानंद उपस्थित होते. हा उपक्रम योग, ध्यान आणि जागतिक शांततेचा संदेश उंच हिमालयीन प्रदेशातून संपूर्ण जगापर्यंत पोहोचवणारा ठरला.

## अहिल्यानगरमध्ये २९ जूनला 'निधी आपके निकट' कार्यक्रम

नगर – निवृत्तीवेतनधारक तसेच कंपनीचे नियोक्ते आणि प्रतिनिधी यांच्यासाठी 'निधी आपके निकट' हा विशेष कार्यक्रम २९ जून रोजी सकाळी ९.३० वाजता कल्पतरु एंटरप्राइजेस इंडिया, कल्पतरू एनक्लेव दुसरा मजला, टायटन आय प्लस वर, गोल्ड जिम, प्रोफेसर चौक, सावेडी, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे.

भविष्यनिर्वाह निधीशी संबंधित कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक किंवा प्रशासनिक अडचणी असल्यास आवश्यक कागदपत्रांसह या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन कर्मचारी भविष्य निधी संघटनेचे सहायक भविष्य निधी आयुक्त यांनी केले आहे.

# रोटरी क्लब मिडटाऊनच्या ग्लोबल ग्रँटमधून उभारलेल्या अद्ययावत डेअरी प्रकल्पाचे उद्घाटन



रोटरी क्लब मिडटाऊनच्या वतीने माऊली सेवा प्रतिष्ठान येथे उभारण्यात आलेल्या 'रोटरी स्वयंपूर्ण डेअरी – फेज २' या अद्ययावत मशिनरी युक्त दुग्ध प्रकल्पाचे उद्घाटन प्रसंगी रोटरी इंटरनॅशनलचे डायरेक्टर राजू सुब्रमण्यन, प्रांतपाल सुधीर लातुरे, जयेश पटेल, प्रमोद परीक, शिरीष रायते, हरीश मोटवाणी, सुरेश साबू, सुहास वैद्य, जगदीश राठी, क्षितिज झावरे, डॉ. विनोद मोरे, महेश गोपालकृष्णन, अजय पिसुटे, अनुराधा आठरे व डॉ.राजेंद्र धामणे आदी.

नगर – रोटरी क्लब मिडटाऊन, अहिल्यानगरच्या वतीने प्राप्त झालेल्या ग्लोबल ग्रँटच्या माध्यमातून देहेरे येथील माऊली सेवा प्रतिष्ठान मधील महिलांसाठी उभारण्यात आलेल्या 'रोटरी स्वयंपूर्ण डेअरी – फेज २' या अद्ययावत मशिनरी युक्त दुग्ध प्रकल्पाचे रोटरी इंटरनॅशनलचे डायरेक्टर राजू सुब्रमण्यन यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी रोटरीचे प्रांतपाल सुधीर लातुरे, पुढील वर्षाचे प्रांतपाल जयेश पटेल, सुहास वैद्य, माजी प्रांतपाल प्रमोद परीक, हरीश मोटवाणी, सुरेश साबू, उद्योजक जगदीश राठी, भावी प्रांतपाल क्षितिज झावरे, शिरीष रायते, रोटरी क्लब मिडटाऊनचे अध्यक्ष डॉ.विनोद मोरे, सचिव महेश गोपालकृष्णन, माजी अध्यक्ष व प्रकल्प प्रमुख अजय पिसुटे, रोटरी क्लब प्रियदर्शनीच्या अध्यक्षा अनुराधा आठरे, अंकित अग्रवाल यांच्यासह रोटरीचे पदाधिकारी, सदस्य आणि नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमात माऊली सेवा प्रतिष्ठानचे संचालक डॉ. राजेंद्र धामणे आणि सुचेता धामणे यांच्या सामाजिक कार्याचा विशेष गौरव करण्यात आला. त्यांच्या समर्पित सेवेबद्दल उपस्थितांनी उभे राहून टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना मानवंदना दिली.

यावेळी राजू सुब्रमण्यन म्हणाले, जीवनातील संकटांमुळे खचलेल्या आणि मनोधैर्य गमावलेल्या महिलांना पुन्हा आत्मविश्वासाने उभे करण्याचे कार्य माऊली सेवा प्रतिष्ठानचे डॉ. राजेंद्र धामणे आणि सुचेता धामणे हे दाम्पत्य गेली अनेक वर्षे निःस्वार्थपणे करत आहेत. मानवता, सेवा आणि साधेपणाचा आदर्श निर्माण करणाऱ्या या संस्थेचे कार्य प्रेरणादायी आहे. रोटरी क्लब मिडटाऊनच्या सहकार्याने उभारण्यात आलेला 'रोटरी स्वयंपूर्ण डेअरी' प्रकल्प येथील महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या प्रकल्पामुळे महिलांचे मनोधैर्य वाढून त्यांना सन्मानाने जीवन जगण्याची नवी दिशा मिळेल.

प्रांतपाल सुधीर लातुरे म्हाणाले, नगरच्या रोटरी क्लब मिडटाऊनने अनेक समाजोपयोगी प्रकल्प यशस्वीपणे उभे केल्याने हा क्लब सतत ग्लोबल ग्रँड मिळवत आहे. माऊली सेवा प्रतिष्ठानचे नि:स्वार्थ काम पाहून भारावून गेलो आहे. येथील दुध डेअरी प्रक्लपामुळे येथील महिला आता आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील. या संस्थेस सहकार्य करून रोटरी क्लब मीडटाऊनने उत्कृष्ट काम केले आहे. यासाठी अजय पिसुटे यांचा पुढाकार कौतुकास्पद आहे.

यावेळी क्षितिज झावरे यांनी रोटरी क्लबच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी ग्लोबल ग्रँड मिळण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल आभार मानून अनेक अडचणींवर मात करत हा प्रकल्प यशस्वीपणे सुरु केल्याचे सांगितले. अजय पिसुटे म्हणाले, माझ्या अध्यक्ष पदाच्या काळात रोटरी स्वयंपूर्ण डेअरीचे फेज १ चे काम झाले. आता फेज २ मुळे हा दुध प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित झाला आहे. आता येथून नागरिकांना गाईंचे शुद्ध व सात्विक दुध उपलब्ध होणार आहे. या प्रक्लापाच्या उभारणीसाठी रोटरी क्लब प्रियदर्शनी, जालना व सोलापूर मिडटाऊन क्लब यांनी सहकार्य केल्याबद्दल सर्वांचे आभार मानून रोटरी स्वयंपूर्ण डेअरी प्रकल्पामधील अद्ययावत मशिनरीची माहिती दिली.

सूत्रसंचालन माजी अध्यक्षा मधुरा झावरे यांनी केले. अनुराधा आठरे यांनी आभार मानले. कार्यक्रमास रोटरीचे क्लबचे प्रियांका पिसुटे, मार्लिन एलिशा, टीना इंगळे, वैशाली कराळे, अॅड.हेमंत कराळे, मधुर बगायत, दिगंबर रोकडे, प्रताप पांडे, रमेश वाबळे, सुजाता वाबळे, अॅड.रमेश वाकळे आदींसह सदस्य उपस्थित होते.

# चेक न वटल्याप्रकरणी आरोपीस सहा महिने कारावासाची शिक्षा

नगर – व्यवहारापोटी देण्यात आलेला चेक न वटल्याप्रकरणी आरोपी भैरु होळकर यांना अहिल्यानगर न्यायालयाने सहा महिने कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

फिर्यादी विवेक सुरेश तवले यांच्याकडून आरोपी यांनी हातउसने ३ लाख रुपये रक्कम घेतली होती. त्या रक्कमेची फिर्यादी तवले आरोपीकडे मागणी केली, असता आरोपीने फिर्यादी तवले यांना ३ लाख रुपयांचा चेक दिला होता. तो चेक फिर्यादी तवले यांनी त्यांच्या बँक खात्यात भरला होता. तो न वटता परत आला, म्हणून आरोपी होळकर विरुद्ध नि.ई.अॅक्ट कलम १३८ अन्वये फिर्यादी तवले यांनी एस.टी.सी.केस नंबर ४९२८/२०२२ ची अहमदनगर येथील अति.न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात दाखल केली होती. या सुनावणीत आरोपी होळकर यास फिर्यादी तवले यांचे कायदेशीर देणे लागत असल्याचा अॅड.भगतसिंग गर्जे यांनी युक्तीवाद केला. तो युक्तीवाद न्यायालयाने ग्राह्य धरुन केसमधील आरोपी भैरु होळकर सहा महिन्याच्या कारावासाची शिक्षा सुनावली.

फिर्यादीच्यावतीने अॅड. भगतसिंग गर्जे यांनी काम पाहिले, त्यांना ज्येष्ठ वकील पोपट टी. पालवे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.



## मोहरम निमित्त सर्वधर्मीयांसाठी भंडाऱ्याचे आयोजन

मोहरमच्या पवित्र पर्वानिमित्त शहरातील जुना बाजार रोड येथील पटवेकर मशिदीसमोर इस्लामपुरा फ्रेंड सर्कल आणि गुलशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वधर्मीय नागरिकांसाठी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. मोहरमच्या आठवी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद लाभला. या भंडाऱ्याचा शुभारंभ नगरसेवक शम्स खान, खान बाबा, फयाज केबलवाला यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मन्सूर सय्यद, शाहिद शेख, फरान शेख, वसीम शेख, अझहर शेख, मोईन शेख, अफान सोलापूरी, वाहिद लाला कुरेशी उपस्थित होते.

# अहिल्यानगरमध्ये २८ जूनला मराठा वधू-वर परिचय मेळावा

नगर – मराठा समाजातील विवाहेच्छुक युवक-युवतींना योग्य जीवनसाथी मिळावा, परस्पर संवाद वाढावा तसेच विवाह जुळवणीची प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी या उद्देशाने स्वराज्य बहुउद्देशीय विकास संस्था संचलित स्वराज्य मराठा वधू-वर सूचक मंडळाच्या वतीने २८ जून रोजी मराठा वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीराम चौक, पाईपलाईन रोड, सावेडी येथील शिवतीर्थ, पहिला मजला, वनश्री बलभीमराव डोके कॉर्नर, संत नामदेव चौक येथे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत हा मेळावा होणार आहे. मराठा समाजातील विवाहेच्छुक युवक-युवतींनी पालकांसह या मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

मेळाव्यात सहभागी होणाऱ्या युवक-युवतींनी बायोडाटा, दोन मोठ्या आकाराचे पूर्ण फोटो, पासपोर्ट साईज फोटो, आधारकार्ड तसेच पॅनकार्ड सोबत आणावेत. नोंदणी व परिचय प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

समाजातील युवक-युवतींना एकमेकांशी परिचय करून देण्यासाठी, संवादाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि विवाह जुळवणीसाठी विश्वासार्ह व्यासपीठ निर्माण करण्याच्या उद्देशाने हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. त्यामुळे मराठा समाजातील विवाहेच्छुक युवक-युवती व त्यांच्या पालकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वराज्य मराठा वधू-वर सूचक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# फसवणुकीच्या खाजगी फौजदारी खटल्यात महिलेस ६ महिने कैद आणि नुकसान भरपाईची शिक्षा

नगर – उसनवारी रक्कम घेतलेल्या परत फेडीपोटी दिलेला धनादेश न वटल्याच्या फसवणुकीच्या खटल्यात आरोपी श्रीमती जमनाबाई मंगल परमार (रा. गांधी ऑईल मिलजवळ, रेल्वे स्टेशन, अहमदनगर) यांचेवर इं. पि. को. कलम ४२० अन्वये फौजदारी गुन्हा सिध्द झाल्यामुळे अहमदनगर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोर्ट नं. ९ यांनी आरोपीस दोषी धरुन ६ महिने साधी कैद व रक्कम रु. ७,८६,५०० नुकसान भरपाई पोटी फिर्यादीस देण्याची शिक्षा सुनावली.

सदर खटल्याची थोडक्यात हकिगत अशी की, भिंगार येथील ओंकार सुपर मार्केटचे संचालक पद्माकर रमेश हरबा (रा. पाटील गल्ली, भिंगार) यांचेकडुन सन २०१५ मध्ये वैद्यकीय उपचारासाठी श्रीमती जमनाबाई मंगल परमार यांनी रक्कम रु. ५,००,००० उसनवार घेतलेली होती. त्या बदल्यात नोटरी पब्लीक यांचेसमोर उसनवार पावती देखील लिहुन दिलेली होती. सदरची रक्कम फिर्यादीस १ ते सव्वा वर्षात परतफेड करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु सदर मुदत उलटुन गेल्या नंतरही त्यांनी सदर रक्कम परत केली नाही. फिर्यादी यांनी या रक्कमेसाठी आरोपी महिलेकडे खुप तगादा केला असता, त्यांनी फिर्यादीस रक्कम रु. ६०,००० रोख स्वरुपात दिले व राहिलेली रक्कम रु. ४,४०,००० चा दिनांक १२/०९/२०१७ रोजीचा स्टेट बँक ऑफ इंडिया मुख्य शाखा, अहमदनगर चा धनादेश फिर्यादीस दिला.

सदरचा धनादेश वरील महिला आरोपीने स्टॉप पेमेंट केल्यामुळे न वटता परत आला. त्यामुळे फिर्यादी पद्माकर रमेश हरबा यांची फसवणुक झाल्यामुळे त्यांनी आरोपी जमनाबाई मंगल परमार यांचेवर अहमदनगर येथील न्यायालयात इं. पि. को. कलम ४२० अन्वये फौजदारी खटला दाखल केला. सदर खटल्याच्या युक्तिवादात फिर्यादीतर्फे आरोपीच्या स्टेट बँक ऑफ इंडियाचे शाखाधिकारी यांची साक्ष नोंदवण्यात आली. त्यांनी दिलेल्या साक्षीनुसार व कागदपत्रानुसार आरोपी जमनाबाई मंगल परमार यांनी फिर्यादीस दिलेल्या धनादेशाच्या आधी दिड ते दोन वर्ष सदर धनादेशाचे पेमेंट स्टॉप केलेले होते व त्याचे कोणतेही कारण बँकेस लेखी स्वरुपात दिलेले नव्हते. त्यामुळे सदरच्या धनादेशाचे १ ते दिड वर्ष पेमेंट स्टॉप करण्यामागे आरोपीचा फिर्यादीस फसविण्याचा हेतु होता, ही बाब न्यायालयाने ग्राहय धरली व आरोपी महिलेस कैद व नुकसान भरपाईची शिक्षा सुनावली.

शिवाय वरील नुकसान भरपाईची रक्कम १ महिन्याचे आत फिर्यादीस न दिल्यास आणखी ६ महिन्याची साधी कैदेची शिक्षा करण्याचे आदेश पारीत केले.

सदर खाजगी फौजदारी खटल्यात फिर्यादी यांचेतर्फे अॅडव्होकेट रमेश अ. जोशी यांनी काम पाहिले त्यांना अॅड. सौ. दिपाली झांबरे व अॅड. राजस करमरकर यांनी सहकार्य केले.

# मोहरमच्या निमित्ताने हिंदू-मुस्लिम ऐक्याचा आदर्श

## महाप्रसादाचे वाटप, पावसासाठी सामूहिक साकडे



नगर तालुक्यातील नेप्ती येथे मोहरमच्या निमित्ताने गावात धार्मिक श्रद्धा, सामाजिक सलोखा आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रेरणादायी दर्शन घडले.

नगर – नेप्ती येथे मोहरमच्या निमित्ताने गावात धार्मिक श्रद्धा, सामाजिक सलोखा आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रेरणादायी दर्शन घडले. नालसाब, इमामी कासम, मौला अली यांच्यासह ताबूतांचे पारंपरिक पद्धतीने स्थापना करण्यात आली. यावेळी गावातील हिंदू व मुस्लिम समाजातील नागरिक, युवक आणि ज्येष्ठ मंडळी होती. सर्व धर्मीय बांधवांनी एकत्रित सहभाग घेत एकोपा आणि बंधुभावाचा संदेश दिला. अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.

यंदा पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर मोहरमच्या कार्यक्रमात सर्वधर्मीय बांधवांनी एकत्र येऊन चांगल्या पावसासाठी प्रार्थना केली. सर्वांच्या शेतात भरघोस पीक यावे, जनावरांना चारा-पाणी मिळावे आणि गावात सुख-समृद्धी नांदावी, अशी भावनिक प्रार्थना करण्यात आली. या प्रसंगामुळे धार्मिक कार्यक्रमाला सामाजिक संवेदनशीलतेचीही जोड मिळाली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मौलाना मुनीर सय्यद आणि हुसेन सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील हिंदू-मुस्लिम युवकांनी एकत्र येऊन सवाऱ्यांची स्थापना केली. स्थापनेच्या दिवशी नाले हैदर यंग पार्टीच्या वतीने इमामवाडा परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

हजरत इमाम हुसेन यांच्या बलिदानातून सत्य, न्याय आणि मानवतेसाठी संघर्ष करण्याची प्रेरणा मिळते. नेप्ती गावात अनेक वर्षांपासून सर्व धर्मीय बांधव परस्पर स्नेह, विश्वास आणि आदराच्या भावनेतून एकत्र राहत आहेत. मोहरमसारख्या धार्मिक पर्वातून समाजात बंधुभाव आणि सामाजिक ऐक्य अधिक दृढ होत असल्याचे समाधान वाटते. मोहरमचा संदेश म्हणजे त्याग, मानवता व सर्वधर्मसमभाव आहे असे प्रतिपादन प्राध्यापक एकनाथ होले यांनी केले.

ते पुढे म्हणाले, आज समाजात एकता आणि माणुसकी जपण्याची गरज अधिक आहे. धर्म, जात आणि पंथ यापलीकडे जाऊन आपण सर्वांनी एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी व्हावे. पावसासाठी सर्व धर्मीय नागरिकांनी एकत्र येऊन केलेली प्रार्थना ही आपल्या गावातील सामाजिक ऐक्याची ताकद दर्शवते. नेप्तीची ही परंपरा भविष्यातील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.

माजी उपसरपंच फारुक सय्यद यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, नेप्ती गावात इतर सर्व धार्मिक उत्सव परस्पर सहकार्याने साजरे करण्याची गौरवशाली परंपरा आहे. गावातील हिंदू-मुस्लिम युवकांनी एकत्र येऊन मोहरमचे आयोजन केल्यामुळे सामाजिक ऐक्य अधिक बळकट झाले आहे. आजच्या कार्यक्रमातून बंधुता, शांतता आणि एकोप्याचा संदेश संपूर्ण समाजापर्यंत पोहोचला आहे. गावातील युवकांनी दाखविलेली एकजूट हीच नेप्तीची खरी ओळख असून भविष्यातही ही परंपरा अधिक बळकट होईल.

नेप्ती ग्रामस्थांच्या वतीने माजी उपसरपंच फारुक सय्यद व प्राध्यापक एकनाथ होले यांच्या हस्ते सवारीला चादर अर्पण करून पावसासाठी सामूहिक साकडे घालून प्रार्थना करून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी माजी उपसरपंच फारुक सय्यद, मार्केट कमिटीचे माजी संचालक वसंत पवार, रामदास फुले, माजी उपसरपंच दादू चौगुले, मौलाना मुनीर सय्यद, प्रा. एकनाथ होले, सलीम सय्यद, हुसेन सय्यद, परवेज सय्यद, भूषण पवार, लौकिक चौगुले, सादिक पवार, संजय राऊत, प्रभाकर चहाळ, संतोष चहाळ, रमेज सय्यद, वसीम सय्यद, साहिल सय्यद, बाबूलाल सय्यद, जावेद सय्यद, जमीर सय्यद, गुलाब सय्यद, उमर सय्यद, युनूस सय्यद, नौशाद शेख, सिकंदर शेख, मुख्तार सय्यद, कय्युम सय्यद, बादशाह सय्यद, वाजिद सय्यद, अन्सार सय्यद, बबन सय्यद, रफिक सय्यद, आसिफ शेख, इमरान सय्यद, नसीर सय्यद, नितीन पवार, हैदर यंग पार्टी व दोस्ती तरुण मंडळाचे कार्यकर्ते ग्रामस्थ उपस्थित होते.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## सर्वात मोठ्या महापुराचा धोका?



मध्य अमेरिकेत या आठवड्यात ऐतिहासिक महापुराचा धोका निर्माण होऊ शकतो, असा इशारा हवामानशास्त्रज्ञांनी दिला आहे. सतत मुसळधार पाऊस आणि वादळे यामुळे काही भागांमध्ये मोठ्या प्रमाणात पूरस्थिती उद्भवू शकते. हवामानविषयक संकेतस्थळ ॲक्यूवेदरने ईशान्य अर्कान्सासपासून पश्चिम केंटकीपर्यंतच्या भागात १,००० वर्षांतील सर्वात मोठी पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता वर्तवली आहे. या भागांत फक्त पाच दिवसांत चार महिन्यांच्या पावसाएवढा पाऊस पडू शकतो. यातील काही भाग आधीच मोठ्या पावसाने प्रभावित झाले असल्याने ते अधिक संवेदनशील ठरू शकतात.

'जीवघेणा आणि ऐतिहासिक महापुराचा धोका निर्माण होऊ शकतो, जो पुढे मोठ्या नदी महापुरात परिवर्तित होऊ शकतो,' असे ॲक्यूवेदरचे प्रमुख हवामानशास्त्रज्ञ जोनाथन पोर्टर यांनी सांगितले. 'या ठिकाणी काही सेकंदांतच परिस्थिती गंभीर बनू शकते आणि लोकांच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो. 'राष्ट्रीय हवामान सेवा (छ्थ्ड) च्या अंदाजानुसार बुधवार (२ एप्रिल) पासून रविवारी (६ एप्रिल) पर्यंत या भागात मुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे लोअर ओहायो व्हॅली, मिड-साऊथ आणि अर्कान्सासमध्ये अचानक महापुराचा धोका वाढेल. हा पाऊस उष्णकटिबंधीय भागातून मध्य अमेरिकेत वाहून येणाऱ्या 'ॲटमॉस्फेरिक रिव्हर'च्या प्रभावामुळे होतो आहे. ही हवामानस्थिती म्हणजे वातावरणात उष्णता आणि पाण्याची वाफ वाहून नेणारा एक लांबट पट्टा आहे. या पाण्याच्या हालचाली धीम्या झाल्यामुळे आणि त्याच भागात सातत्याने पाऊस पडल्यामुळे महापुराची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे.

## हवेतील आर्द्रतेपासून पाणीनिर्मिती

मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एमआयटी) च्या संशोधकांनी एक असे उपकरण विकसित केले आहे, जे हवेतील आर्द्रता शोषून घेते आणि काही मिनिटांत तिचे पिण्याच्या पाण्यात रूपांतर करते. ही नवीन तंत्रज्ञान प्रणाली नैसर्गिक पाण्याचे स्रोत दुर्मीळ असलेल्या समुदायांना स्वच्छ पाणी पुरवण्यासाठी भविष्यात उपयोगी ठरेल, अशी आशा टीमने व्यक्त केली आहे.

वातावरणातील पाणी संकलन (Atmospheric Water Harvesting - AWH) प्रणाली हवेतून ओलावा खेचून घेतात आणि त्याचे द्रवरूप पाण्यात संघनन (Condensation) करतात. यासाठी सामान्यतः दमट हवा थंड केली जाते किंवा 'शोषक' नावाच्या स्पंजसारख्या सामग्रीचा वापर केला जातो, जी पाण्याची वाफ शोषून घेते. पारंपरिक अथक उपकरणांमध्ये शोषकातून पाणी बाष्पीभवन करण्यासाठी सूर्यप्रकाशावर अवलंबून राहावे लागते, ज्यासाठी अनेक तास किंवा दिवस लागू शकतात. यामुळे ही उपकरणे कोरड्या, संसाधनांची कमतरता असलेल्या प्रदेशांमध्ये कमी उपयुक्त ठरतात.

'एमआयटी'चे नवे तंत्रज्ञान : 'एमआयटी'चे नवीन उपकरण मात्र शोषकातून आर्द्रता वेगळी करण्यासाठी अल्ट्रासोनिक लहरींचा वापर करते. संशोधकांच्या मते, त्यांचे अल्ट्रासोनिक प्रोटोटाईप केवळ बाष्पीभवनाच्या तुलनेत शोषलेले पाणी काढण्यात ४५ पट अधिक कार्यक्षम आहे. या अभ्यासाच्या सह-लेखिका आणि एमआयटीमधील प्रमुख संशोधन वैज्ञानिक स्वेतलाना बोरिस्किना यांनी सांगितले की, 'वातावरणातून पाणी काढण्याचे मार्ग लोक शोधत आहेत. विशेषतः वाळवंटी प्रदेशांसाठी आणि ज्या ठिकाणी समुद्राचे खारे पाणी गोड करण्यासाठीचे पर्यायही उपलब्ध नाहीत, अशा ठिकाणी हे पाण्याचे मोठे स्रोत असू शकते.

आता आमच्याकडे पाणी त्वरित आणि कार्यक्षमतेने पुनर्प्राप्त करण्याचा एक मार्ग आहे. 'एमआयटी'च्या या दृष्टिकोनात अल्ट्रासाऊंड वापरला जातो, जो मानवी श्रवण मर्यादेपलीकडील २० किलोहर्ट्झपेक्षा जास्त वारंवारतेवर प्रवास करतो. अथक उपकरणाच्या मध्यभागी एक सपाट सिरेमिक रिंग आहे,



जी व्होल्टेज दिल्यावर कंप होते. शोषलेले पाणी आणि सामग्रीच्या पृष्ठभागामधील कमकुवत बंध तोडण्यासाठी उच्च-वारंवारतेचे स्पंद आदर्श असल्याचे संशोधकांना आढळले.

प्रमुख लेखक आणि 'एमआयटी' पदवीधर विद्यार्थी इकरा इफ्तेखार शुवो यांनी सांगितले की, 'हे असे आहे की, पाणी लहरींसह नृत्य करत आहे आणि या लक्ष्यित अडथळ्यामुळे पाण्याचे रेणू सोडण्याची गती निर्माण होते आणि ते थेंबांच्या रूपात बाहेर पडताना दिसतात.' संशोधकांनी वेगवेगळ्या आर्द्रता स्तरांवर सेट केलेल्या चेंबरमध्ये शोषक सामग्रीच्या नमुन्यांवर या उपकरणाची चाचणी केली. प्रत्येक चाचणीत, उपकरणाने केवळ काही मिनिटांत नमुने पूर्णपणे कोरडे केले.

## पाकिस्तानच्या विद्यापीठात संस्कृतचा उद्घोष

१९४७ मध्ये फाळणी झाल्यानंतर प्रथमच पाकिस्तानच्या एका मोठ्या विद्यापीठात संस्कृत भाषेचे वर्ग सुरू करण्याची तयारी सुरू आहे. लाहोर युनिव्हर्सिटी ऑफ मॅनेजमेंट सायन्सेस (LUMS) च्या गुरमानी सेंटरमध्ये संस्कृत शिकवण्याची पूर्ण तयारी सुरू आहे. अनेक विद्वानांचे म्हणणे आहे की, हे पाऊल भारत आणि पाकिस्तानचा सांस्कृतिक इतिहास जोडणारा सिद्ध होऊ शकते.

या पुढाकारामुळे आगामी काळात पाकिस्तानातच शिकलेले संस्कृत जाणकार आणि गीता-महाभारताचे विशेषज्ञ पाहायला मिळणार आहेत. या घोषणेमुळे विद्यार्थी, संशोधन अभ्यासक आणि दक्षिण आशियाई इतिहास समजून घेऊ इच्छिर्णा ?यांमध्ये खूप उत्साह आहे. भारत आणि पाकिस्तानच्या संबंधात अनेकदा तणावाच्या बातम्या येत असल्या, तरी याच दरम्यान पाकिस्तानकडून एक अत्यंत सकारात्मक पुढाकार समोर आला आहे.



गुरमानी सेंटरचे संचालक डॉ. अली उस्मान कासमी यांचे म्हणणे आहे की, हे पाऊल नवीन संधी उघडेल आणि येत्या १०-१५ वर्षांत पाकिस्तानात जन्मलेले विद्वान संस्कृत, गीता आणि महाभारतावर सखोल संशोधन करताना दिसतील.


संस्कृत ही जगातील सर्वात जुन्या आणि समृद्ध भाषांपैकी एक मानली जाते. १९४७ च्या फाळणीनंतर पाकिस्तानात ती कधीही औपचारिकपणे शिक्षणाचा भाग नव्हती. आता अनेक दशकांनंतर डणचड मध्ये तिचे पुनरागमन होताना दिसत आहे. याला दक्षिण आशियाच्या सामायिक, सांस्कृतिक आणि बौद्धिक परंपरांना पुन्हा जोडण्याचे संकेत मानले जात आहेत. संस्कृत भाषेचे संशोधक डॉ. शाहिद रशीद या पुढाकारावर खूश आहेत. त्यांनी स्वतः अनेक वर्षे या भाषेचा अभ्यास केला आहे. त्यांच्या मते, डणचड मधील संस्कृतची सुरुवात छोटी असली, तरी ती खूप महत्त्वाची आहे.

कारण, ही त्या भाषेला पुन्हा समोर आणत आहे, जिने शतकानुशतके संपूर्ण प्रदेशाच्या साहित्यिक, दार्शनिक आणि आध्यात्मिक विचारांना आकार दिला आहे. गुरमानी सेंटरनुसार, संस्कृत कोर्ससाठी विद्यार्थी आणि संशोधकांकडून मोठी आवड व उत्सुकता दर्शवली जात आहे. दक्षिण आशियाचा इतिहास, धर्म, संस्कृती आणि विचार समजून घेण्यासाठी तरुण पुन्हा प्राचीन भाषांकडे वळत आहेत. सेंटर लवकरच या दिशेने आणखी उपक्रम राबवण्याची योजना करत आहे, जेणेकरून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या भाषेशी जोडले जाऊ शकेल.

## चित्ता नामशेष होऊ नये म्हणून...

जगातील सर्वात वेगवान भूचर प्राणी असलेल्या चित्त्याला भविष्यात नामशेष होण्यापासून वाचवण्यासाठी नामिबियामध्ये एक चित्ता शुक्राणू बँक (चित्ता स्पर्म बँक) तयार करण्यात आली आहे. अमेरिकेच्या प्राणीशास्त्रज्ञ लॉरी मार्कर गेल्या ३५ वर्षांपासून नामिबियातील चित्ता संवर्धन निधीमध्ये (चित्ता कंझर्वेशन फंड : सीसीएफ) हे नमुने गोळा करत आहेत.

लॉरी मार्कर यांनी १९९० पासून ही शुक्राणू बँक अर्थात चित्त्यांचे गोठलेले प्राणिसंग्रहालय (फ्रोझन झू) म्हणून तयार केले आहे. गंभीर परिस्थितीत, जेव्हा चित्त्यांची संख्या खूपच कमी होईल, तेव्हा कृत्रिम प्रजननाद्वारे (आर्टिफिशली रिप्रॉडक्शन) चित्त्यांची प्रजाती वाचवण्यासाठी या शुक्राणूंचा उपयोग केला जाईल. या शुक्राणू बँकेत आतापर्यंत सुमारे ४०० हून अधिक चित्त्यांचे नमुने द्रव नायट्रोजनमध्ये अति-कमी तापमानात साठवले गेले आहेत. हे नमुने मुख्यतः जखमी झालेल्या किंवा



पकडलेल्या चित्त्यांवर उपचार करताना घेतले जातात. आज जगात सात हजारहून कमी चित्ते जंगलात उरले आहेत. अधिवासाचे नुकसान, मानवांसोबतचा संघर्ष, अवैध प्राणी शिकार आणि व्यापार यामुळे चित्त्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे.

चित्त्यांची संख्या कमी झाल्यामुळे त्यांच्या जनुकीय विविधतेचा (जेनेटिक डायव्हर्सिटी) अभाव आहे. यामुळेच त्यांच्यामध्ये ७०-८० टक्के शुक्राणू असामान्य (ॲब्नॉर्मल स्पर्म) असतात. मार्कर यांच्या मते, जनुकीय विविधतेचा अभाव आणि कमी प्रजनन दर यामुळे भविष्यात चित्त्यांना वाचवण्यासाठी शुक्राणू बँक अत्यंत आवश्यक ठरू शकते. पांढऱ्या गेंड्यासारख्या नामशेष होण्याचा धोका असलेल्या प्रजातींना वाचवण्यासाठी गोठवलेले शुक्राणू (फ्रोझन स्पर्म) वापरण्याचे प्रयत्न सध्या सुरू आहेत. तसेच, अमेरिकेत एकदा जवळजवळ नामशेष झालेल्या ब्लॅक-फूटेड फेरेट या प्राण्याचे कृत्रिम प्रजननाने यशस्वी संवर्धन करण्यात आले आहे. शुक्राणू बँक ही चित्त्यांसाठी अंतिम उपाययोजना आहे आणि या प्रयत्नांमुळे जगातील या सर्वात वेगवान भूचर प्राणी असलेल्या चित्त्याला वाचवण्याची आशा निर्माण झाली आहे.

## सर्वाधिक तापमानाचा विक्रम मानवी चुकीमुळे?

डेथ व्हॅलीने ११२ वर्षांपासून पृथ्वीच्या पृष्ठभागावर मोजल्या गेलेल्या सर्वाधिक हवेच्या तापमानाचा जागतिक विक्रम आपल्या नावावर ठेवला आहे. परंतु, जुलै १९१३ मध्ये नोंदवलेला हा विक्रम मानवी चुकीमुळे झाला असावा, असा संशय व्यक्त करत शास्त्रज्ञांनी तो रद्द करण्याची मागणी केली आहे. यूएस वेदर ब्युरोच्या आकडेवारीनुसार, डेथ व्हॅलीमधील ग्रीनलँड रँच येथे १० जुलै १९१३ रोजी तापमान १३४ फॅरेनाईट (५६.७ अंश सेल्सिअस) पर्यंत पोहोचले होते. त्यानंतर जागतिक तापमानवाढ होऊनही या प्रदेशातील तापमान फार क्वचितच १३० फॅरेनाईट (५४.४ अंश सेल्सिअस ) पर्यंत पोहोचले आहे.

अलबामा विद्यापीठाचे हवामानशास्त्रज्ञ रॉय स्पेन्सर




यांच्या नेतृत्वाखालील एका नवीन अभ्यासात, १९२३ ते २०२४ दरम्यान ग्रीनलँड रँचच्या २५० कि.मी. परिसरातील अन्य हवामान केंद्रांच्या तापमानाचे विश्लेषण करण्यात आले. उंचीनुसार डेटा समायोजित केल्यानंतर, संशोधकांना आढळले की, १० जुलै १९१३ रोजी ग्रीनलँड रँचचे तापमान प्रत्यक्षात १२० फॅरेनाईट (४८.९ अंश सेल्सिअस) च्या आसपास असावे, जे १३४ पेक्षा खूप कमी आहे. अभ्यासानुसार, १९१३ च्या सुरुवातीच्या जुलैमध्ये मोजलेले असामान्यरीत्या उच्च तापमान आसपासच्या केंद्रांवरील तापमानाशी सुसंगत नव्हते.

१९११ मध्ये स्थापित झालेले वेधशाळेचे निवारागृह सुरुवातीला सिंचन केलेल्या अल्फाल्फा शेताच्या काठावर होते. परंतु, रँचचा फोरमन ऑस्कर डेंटन याने अघोषितपणे ते अधिक उष्ण ठिकाणी, मोकळ्या जमिनीवर हलवले असावे, असा अभ्यासात तर्क मांडला आहे. याशिवाय, डेंटनने वेधशाळेच्या अधिकृत नोंदीऐवजी रँचच्या व्हरांड्यावरील थर्मामीटरच्या अनधिकृत नोंदी वापरल्या असाव्यात, असाही अंदाज स्पेन्सर यांनी व्यक्त केला. व्हरांड्यावरील थर्मामीटर अनेकदा खूप जास्त तापमान दाखवत असे. संशोधकांना खात्री आहे की, १३४ ही नोंद चुकीची आहे आणि डब्ल्यूएमओने या प्रकरणाची पुढील तपासणी करावी, अशी मागणी केली आहे.

## पूर्ण अंधारात स्पष्ट प्रतिमा टिपता येणार!

विज्ञानाच्या जगात निसर्गाकडून प्रेरणा घेऊन अनेक क्रांतिकारी शोध लावले जातात. नुकतेच चीनमधील शास्त्रज्ञांनी सापांच्या उष्णता शोधण्याच्या क्षमतेचा (Heat- sensing) आधार घेऊन एक अत्याधुनिक आर्टिफिशिअल इमेजिंग सिस्टम विकसित केली आहे. हा जगातील असा पहिलाच सेन्सर आहे जो पूर्ण अंधारातही '४के रिझोल्यूशन' (३,८४० बाय २,१६० पिक्सेल्स) मध्ये इन्फ्रारेड (IR) फोटो घेऊ शकतो. विशेष म्हणजे, याची गुणवत्ता आयफोन १७ प्रो (iPhone 17 Pro) च्या कॅमेऱ्याशी बरोबरी करणारी आहे.

निसर्गात 'पिट वायपर्स' सारख्या काही सापांच्या प्रजातींकडे त्यांच्या नाकाच्या जवळ 'पिट ऑर्गन' नावाचे एक विशेष अंग असते. हे अंग त्यांना अंधारातही भक्ष्याकडून उत्सर्जित होणारी उष्णता (इन्फ्रारेड लहरी) पाहण्यास मदत करते. मानवी डोळे फक्त दृश्य प्रकाश पाहू शकतात; परंतु साप लांब पल्ल्याच्या इन्फ्रारेड लहरींना ओळखू शकतात. याच संकल्पनेचा वापर 'बीजिंग इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'च्या शास्त्रज्ञांनी आपले नवीन तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी केला आहे. निसर्गात ज्या वस्तूचे तापमान उणे २७३ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त असते, त्यातून इन्फ्रारेड लहरी बाहेर पडतात.



शास्त्रज्ञांनी या लहरी टिपण्यासाठी एका ८ इंची डिस्कवर विविध थरांची मांडणी केली आहे: १.क्वांटम डॉटसब लेयर: यात मर्क्युरी आणि टेल्युरियमपासून बनलेले सूक्ष्म कण आहेत, जे इन्फ्रारेड लहरी शोषून घेतल्यावर विद्युत प्रभार तयार करतात. २.अपकन्व्हर्टर (LED) लेयर: हे विद्युत प्रभार एका विशिष्ट लेयरमधून जातात, जिथे त्यांचे रूपांतर हिरव्या दृश्य प्रकाशामध्ये केले जाते.

३.CMOS सेन्सर: अखेरीस हा प्रकाश एका सेन्सरद्वारे हाय-रिझोल्यूशन प्रतिमेत रूपांतरित होतो.

**शोधाचे महत्त्व**

या नवीन सिस्टीमचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे हे उपकरण 'सामान्य तापमानाला' (Room Temperature) काम करू शकते. सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या इतर इन्फ्रारेड सिस्टिम्सना उष्णतेमुळे येणारा अडथळा (Noise) टाळण्यासाठी अत्यंत खर्चिक अशा 'क्रायोजेनिक कूलिंग'ची (अतिशय थंड वातावरण) गरज असते. मात्र, चिनी शास्त्रज्ञांनी विकसित केलेल्या या तंत्रज्ञानात सर्व लेयर्स एकावर एक असल्याने सिग्नलची हानी होत नाही आणि कूलिंगची गरज भासत नाही. हे संशोधन २० ऑगस्ट रोजी प्रसिद्ध 'नेचर' जर्नलमध्ये प्रकाशित करण्यात आले आहे. हे तंत्रज्ञान भविष्यात संरक्षण क्षेत्र, वैद्यकीय तपासणी आणि रात्रीच्या वेळी केल्या जाणाऱ्या फोटोग्राफीमध्ये मोठी क्रांती घडवून आणू शकते.

या नवीन सिस्टीमचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे हे उपकरण 'सामान्य तापमानाला' (Room Temperature) काम करू शकते. सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या इतर इन्फ्रारेड सिस्टिम्सना उष्णतेमुळे येणारा अडथळा (Noise) टाळण्यासाठी अत्यंत खर्चिक अशा 'क्रायोजेनिक कूलिंग'ची (अतिशय थंड वातावरण) गरज असते. मात्र, चिनी शास्त्रज्ञांनी विकसित केलेल्या या तंत्रज्ञानात सर्व लेयर्स एकावर एक असल्याने सिग्नलची हानी होत नाही आणि कूलिंगची गरज भासत नाही. हे संशोधन २० ऑगस्ट रोजी प्रसिद्ध 'नेचर' जर्नलमध्ये प्रकाशित करण्यात आले आहे. हे तंत्रज्ञान भविष्यात संरक्षण क्षेत्र, वैद्यकीय तपासणी आणि रात्रीच्या वेळी केल्या जाणाऱ्या फोटोग्राफीमध्ये मोठी क्रांती घडवून आणू शकते.

## गिळलेला लायटर तीस वर्षे पोटातच!

चीनच्या चेंगदू शहरात एक अत्यंत धक्कादायक आणि वैद्यकीय विज्ञानाला चकित करणारी घटना समोर आली आहे. एका व्यक्तीने दारूच्या नशेत लावलेल्या शर्तीतून सिगारेटचा लायटर गिळला होता. हा लायटर तब्बल ३० वर्षांहून अधिक काळ त्याच्या पोटात होता.



पोटदुखी आणि सूज वाढल्याने तो रुग्णालयात दाखल झाला, तेव्हा ही बाब उघड झाली. ३० वर्षांपूर्वीची घटना डेंग नावाच्या या रुग्णाने डॉक्टरांना सांगितले की, सुमारे १९९१ किंवा १९९२ मध्ये तो मित्रासोबत दारू पीत असताना, त्याने शर्त पूर्ण करण्यासाठी लायटर गिळला होता. त्याला वाटले होते की, तो नैसर्गिकरीत्या बाहेर पडेल; पण तसे झाले नाही आणि ३० वर्षे कोणतीही मोठी अडचण न येता तो पोटात राहिला. गेल्यामहिन्यापासून पोटात तीव्र वेदना सुरू झाल्यावर डेंग रुग्णालयात पोहोचला.

गॅस्ट्रोस्कोपीमध्ये डॉक्टरांना त्याच्या पोटात एक काळी, आयताकृती वस्तू दिसली. डॉक्टरांनी सुरुवातीला लायटर काढण्यासाठी नेहमीच्या चिमट्याचा वापर करण्याचा प्रयत्न केला; पण लायटरची पृष्ठभाग खूप गुळगुळीत असल्याने तो पकडताच निसटत होता. अखेरीस, डॉक्टरांनी लायटरला सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी कंडोम वापरण्याचा अभिनव निर्णय घेतला. केवळ २० मिनिटांत ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाली. बाहेर काढलेला ७ सेंटिमीटर लांबीचा लायटर सडलेल्या पदार्थाने झाकलेला होता. डॉक्टरांनी डेंगला त्याच्या निष्काळजीपणाबद्दल गंभीरपणे ताकीद दिली. कारण, लायटरमधील ज्वलनशील वायू लीक झाल्यास किंवा पोटातील ॲसिडशी प्रतिक्रिया झाल्यास जीवघेणा धोका निर्माण होऊ शकला असता.

## गूढ पाचव्या वर्षी आई बनलेल्या चिमुकलीचे

१९३९ मध्ये पेरूची लीना मार्सेला मेदिना हिने केवळ ५ वर्षांच्या वयात एका मुलाला जन्म देऊन संपूर्ण जगाला चकित केले होते. ८५ वर्षांनंतरही तिला गर्भवती करणारी व्यक्ती कोण होती, याबाबतचे रहस्य आजही कायम आहे.

इतक्या लहान वयात लीनाचा लैंगिक विकास कसा झाला, याबद्दल वैज्ञानिक आजही आश्चर्य व्यक्त करतात.

लीनाचा परिवार अत्यंत गरीब होता. जेव्हा लीनाचे पोट वाढू लागले, तेव्हा तिच्या आई-वडिलांनी याला पोटातला सैतान मानून मांत्रिकांकडून उपचार घेतले. मात्र, जेव्हा तिचे वडील तिला स्थानिक रुग्णालयात घेऊन गेले, तेव्हा डॉक्टरांना समजले की, लीना सात महिन्यांची गर्भवती आहे.

जन्म: १४ मे १९३९ रोजी, केवळ ५ वर्षांच्या वयात लीनाने सी-सेक्शनद्वारे एका मुलाला जन्म दिला. मुलाचे वजन सुमारे २.७ किलोग्रॅम होते



आणि त्याला कोणताही त्रास झाला नाही. वैद्यकीय तपासणीतून असे दिसून आले की, लीनाला असामान्यपणे लवकर यौवन प्राप्त झाले होते, त्यामुळे ती इतक्या लहान वयात गर्भधारणा करण्यास सक्षम लीनाची कहाणी वैद्यकीय चमत्कार असली, तरी तिला गर्भवती करणारा कोण होता, हा प्रश्न आजही सामाजिक न्यायासाठी एक आव्हान आहे. सुरुवातीला, लीनाच्या वडिलांना संशयावरून ताब्यात घेण्यात आले होते; परंतु चौकशीत लैंगिक शोषणाचे कोणतेही पुरावे किंवा साक्षीदार न मिळाल्याने त्यांना सोडण्यात आले. त्यानंतर लीनाचा काका आणि मानसिक आजारी असलेला भाऊ देखील चौकशीच्या कक्षेत आले. तसेच, लीनाची गर्भधारणा जाहीर झाल्यावर रहस्यमयपणे गायब झालेल्या माळी काम करणाऱ्या व्यक्तीवरही पोलिसांना संशय होता. आज ८५ वर्षांनंतरही या प्रकरणात कोणत्याही व्यक्तीला औपचारिकपणे दोषी ठरवले गेलेले नाही आणि पित्याची ओळख आजतागायत एक न सुटलेले रहस्य राहिली आहे.

लीनाने आपल्या मुलाला घरी वाढवले; मात्र त्याला हेच सांगण्यात आले की, ती त्याची मोठी बहीण आहे. १० वर्षांचा झाल्यावर त्याला सत्य सांगण्यात आले. लीनाच्या मुलाचे नाव गेरार्डो ठेवले होते, ज्या डॉक्टरांनी तिला प्रसूतीसाठी मदत केली, त्यांच्या सन्मानार्थ हे नाव देण्यात आले.१९७९ मध्ये, वयाच्या ४० व्या वर्षी अस्थि मज्जा रोगाने गेरार्डोचे निधन झाले. लीना मेदिना आजही जिवंत आहेत की नाही, याची माहिती उपलब्ध नाही; पण जर ती जिवंत असेल तर तिचे वय ९२ वर्षे असेल. त्यांची ही कहाणी वैद्यकीय विज्ञानासाठी एक आश्चर्य आणि सामाजिक न्यायासाठी एक अनुत्तरित प्रश्न आहे.







पहिल्या छायाचित्रात २५ जून रोजी रात्री मोहरमनिमित्त निघालेल्या कत्तलची रात्र सवारी मिरवणुकीत सहभागी झालेले हजारो भाविक तर दुसऱ्या व तिसऱ्या छायाचित्रात मोहरम विसर्जन मिरवणुकीसाठी तैनात करण्यात आलेला पोलीस बंदोबस्त.

# डोळ्यांत कारुण्याचे अश्रू अन् या हुसेनच्या जयघोषात तब्बल दहा तास चालली

## कत्तलची रात्र सवारी मिरवणूक; मोहरम विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ

नगर – शहरातील ऐतिहासिक आणि शतकी परंपरा लाभलेल्या मोहरम सणाच्या कत्तलची रात्र सवारी मिरवणुकीला २५ जून रोजी रात्री १२ वाजता कोठला येथील इमामवाड्यातून अत्यंत भावूक आणि उत्साही वातावरणात सुरुवात झाली. या हुसेन, या हुसेन...च्या गगनभेदी आणि हृदयस्पर्शी घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. ही मिरवणूक तब्बल १० तास चालली. २६ जून रोजी सकाळी कोठला येथे या सवारी बसल्या व पुन्हा दुपारी १२ वाजता मोहरमची विसर्जन मिरवणूक सुरु झाली.

इमाम हुसेन यांच्या बलिदानाच्या आठवणीत भाविकांच्या डोळ्यांत दाटलेले अश्रू आणि तोंडातून या हुसेन, या हुसेनचा जयघोष अशा भावूक वातावरणात २५ जून रोजी रात्री कत्तलची रात्र मिरवणुकीला प्रारंभ झाला. कोठला येथील इमामवाडा येथून मानाच्या सवाऱ्या मार्गस्थ झाल्या. यात ५ मानाचे टेंभे आणि पुढे ढोल–ताशांचे पथक अशा पारंपारिक पद्धतीने ही मिरवणूक निघाली. फलटण चौकी परिसरात ही मिरवणूक आली असता सवारी घेण्यावरुन किरकोळ गोंधळ झाला होता. मात्र, पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करीत मिरवणूक पुढे मार्गस्थ केली. त्यानंतर ही मिरवणूक राज चेंबर्स, मंगलगेट, आडते बाजार, तेलीखुंट, कापड बाजार, मोची गल्ली, भिंगारवाला चौक, गांधी मैदान, पटवर्धन चौक, जुना कोर्ट, पंचवीर चावडी, जुना मंगळवार बाजार, हातमपुरा, रामचंद्र खुंट रोडमार्गे परत कोठला येथे पोहोचली. मिरवणुकीत सहभागी झालेल्या तरुणांनी आणि भाविकांनी इमाम हुसेन यांच्या बलिदानाचा शोक व्यक्त करत मातम केला. अनेकांच्या डोळ्यांत यावेळी अश्रू तरळत होते. सवारी पाहण्यासाठी व दर्शनासाठी अबालवृद्धांनी मोठी गर्दी केली होती. २६ जून रोजी सकाळी १० वाजता कोठला येथील इमामवाड्यात या सवारी पुन्हा बसल्या. हजारो भाविकांच्या उपस्थितीत निघालेली ही मिरवणूक शांततेत पार पडली.



२६ जून रोजी दुपारी १२ वाजता कोठला येथून मोहरम विसर्जन मिरवणुकीस प्रारंभ झाला.

### मोहरमच्या मुख्य मिरवणुकीला प्रारंभ

२५ जून रोजी रात्री १२ वाजता कत्तलची रात्र मिरवणूक निघाल्यानंतर २६ जून रोजी सकाळी १० वाजता कोठला येथे या सवाऱ्या बसल्या. पुन्हा दुपारी १२ वाजता मोहरमच्या मुख्य मिरवणुकीला प्रारंभ झाला. कोठला, फलटण चौकी, बारा इमाम हवेली, मंगलगेट, आडते बाजार, पिंजार गल्ली, पारशा खुंट, जुना कापड बाजार, खिस्त गल्ली, बुरुड गल्ली, जुना बाजार, पंचपीर चावडी, जुनी मनपा, दो बोटी चिरा मस्जिद, कोर्ट मागील रस्ता, चौपाटी कारंजा, दिल्ली गेट, नीलक्रांती चौक, बालिकाश्रम रोड, बारा इमाम बारव, सावेडी गाव असा या मिरवणुकीचा मार्ग असणार आहे. दुपारी २:३० वाजेपर्यंत ही मिरवणूक मंगलगेट येथे पोहोचली होती. मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी भाविकांना पाणी, सरबत वाटप केले जात होते. हिंदू समाजाने मुस्लिम बांधवांसाठी पाणी, सरबत वाटप करीत सेवा केली.

### मोठा पोलीस बंदोबस्त तैनात

मिरवणुकीदरम्यान काही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मिरवणुकीवर ड्रोन आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा वॉच तसेच शेकडो पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, २ अप्पर पोलीस अधीक्षक, ५ पोलीस उपअधीक्षक, २१ पोलीस निरीक्षक आणि तब्बल ८५० पोलीस अंमलदार मिरवणुकीवर लक्ष ठेवून आहेत. काही पोलीस खाकी गणवेशात तर काही पोलीस साध्या वेशात मिरवणुकीत सहभागी झाले. शहरातील संवेदनशील आणि अतिसंवेदनशील भागांवर पोलीस विशेष निगराणीची व्यवस्था करण्यात आली आहे. शहरातील काही इमारतींवरुनही पोलीस मिरवणुकीवर नजर ठेवून आहेत.

### मिरवणुकीसाठी सहकार्य करा : मुम्मका सुदर्शन

१६ जूनपासून मोहरम सुरु झालेला आहे. २५ जून रोजी कत्तलची रात्र मिरवणूक शांततेत पार पडली. आता मुख्य विसर्जन मिरवणूक सुरु झाली आहे. या मिरवणुकीसाठी मोठा बंदोबस्त तैनात केलेला आहे. आज, २६ जून रोजी रात्री मोहरम सण संपणार आहे. हा शेवटचा दिवस आहे. मी सर्वांना विनंती करतो की हा उत्सव शांततेत पार पाडावा. मिरवणुकीसाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केले.

# 'सीए फायनल' परीक्षेत सिद्धांत बोगावतचे यश

जामखेड – 'इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स' तर्फे मे २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या 'सीए फायनल' परीक्षेमध्ये जामखेड येथील सिद्धांत बोगावत याने पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले आहे.



यापूर्वी सिद्धांतने 'सीए फाऊंडेशन' परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली होती. त्यानंतर 'सीए इंटरमीडिएट' च्या परीक्षेत त्याने संपूर्ण नगर जिल्ह्यात चौथा क्रमांक मिळवून आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवून दिली होती. विशेष म्हणजे, सीएच्या अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या सर्वच परीक्षा सिद्धांतने पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण करण्याचा बहुमान मिळवला आहे.

सिद्धांत हा जामखेडचे व्यावसायिक कै. पोपटलाल बोगावत यांचा नातू असून सौ. नुतन व संदीप बोगावत यांचा पुत्र आहे.

या यशाविषयी बोलताना सिद्धांतने सांगितले की, पुण्याची संस्था 'शहा खंडेलवाल जैन अ‍ॅण्ड असोसिएट्स' येथे आर्टिकलशिप करत असताना त्याला आशिष खंडेलवाल सरांचे मार्गदर्शन लाभले. तसेच 'सीए' यश राजेश डागा यांचे विशेष मार्गदर्शन आणि आई–वडिलांची निरंतर लाभलेली प्रेरणा हेच आपल्या या मोठ्या यशाचे मुख्य गमक आहे.

# अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघात दिव्यांगांना मोफत साधनांचे वितरण

## खासदार निलेश लंके यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक



नगर – अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघातील दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत सहाय्यक साधने व उपकरणे वितरणाकरिता मूल्यमापन शिबिरांचे आयोजन करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष आढावा बैठक पार पडली. खासदार निलेश लंके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत शिबिरांच्या यशस्वी आयोजनासाठी विविध उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी बोलताना खासदार लंके यांनी सांगितले की, मतदारसंघातील जास्तीत जास्त गरजू दिव्यांग बांधवांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त दिव्यांगांपर्यंत ही माहिती पोहोचवून त्यांना नोंदणीसाठी मदत करावी, असे आवाहन त्यांनी केले. शिबिरांमध्ये पात्र ठरलेल्या दिव्यांगांना अत्याधुनिक आणि दर्जेदार सहाय्यक साधने व उपकरणे मोफत पुरवली जातील, ज्यायोगे त्यांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी होऊन ते अधिक स्वावलंबी होऊ शकतील. या उपक्रमांतर्गत व्हीलचेअर, ट्रायसायकल, कुबड्या, श्रवणयंत्र, कृत्रिम अवयव यांसारखी विविध साधने वितरित केली जाणार आहेत. शिबिरांच्या तारखा आणि ठिकाणे लवकरच जाहीर केली जातील, असे सांगण्यात आले.

या आढावा बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दिव्यांग सेलचे जिल्हाध्यक्ष रत्नाकर ठाणगे, खासदार निलेश लंके प्रतिष्ठान दिव्यांग संघटनेचे सुनील करंजुले, सावली दिव्यांग संघटनेचे बाबासाहेब महापुरे, बाहुबली वायकर, प्रहार दिव्यांग संघटनेचे मधुकर धाडगे, पोपट शेळके, आसान दिव्यांग संघटनेचे संजय सावळे, प्रहार संघटनेचे लक्ष्मण पोकळे, महाराष्ट्र राज्य दिव्यांग संघटनेचे संतोष सरवदे, बाळासाहेब चव्हाण, तसेच जिल्हा सक्षमीकरण अधिकारी देविदास कोकाटे यांच्यासह विविध अधिकारी आणि दिव्यांग संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# दिव्यांगां'च्या शिक्षणावर गदा?; विशेष शिक्षकांना बीएलओ कामावर पाठवल्याने संताप; सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला हरताळ; विशेष शिक्षकांना अशैक्षणिक कामांचे आदेश

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका शिक्षण विभागातील केंद्रस्तरीय विशेष शिक्षकांना बीएलओ तसेच इतर अशैक्षणिक कामांवर नियुक्त करण्यात आल्याने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या मूलभूत अधिकारांवर गदा येत असल्याचा आरोप 'केंद्र विशेष शिक्षक सेल, अहिल्यानगर' च्या वतीने करण्यात आला आहे. या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून विशेष शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करण्यात यावे, तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी संघटनेचे जिल्हाध्यक्ष उमेश शिंदे यांनी केली आहे.

यासंदर्भात दिव्यांग कल्याण आयुक्त, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष, शिक्षण आयुक्त, राज्य व जिल्हास्तरीय शिक्षण अधिकारी तसेच संबंधित प्रशासनाकडे सविस्तर निवेदन दिले आहे. निवेदनात दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण करण्यासाठी तात्काळ पावले उचलण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनानुसार, दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ (RPwD Act) आणि शिक्षणाचा हक्क कायदा २००९ (RTE Act) यांच्या तरतुदींनुसार प्रत्येक दिव्यांग विद्यार्थ्याला विशेष शिक्षण, थेरपी, समुपदेशन तसेच आवश्यक शैक्षणिक सहाय्य उपलब्ध करून देणे ही शासनाची कायदेशीर जबाबदारी आहे. मात्र, अहिल्यानगर महानगरपालिका शिक्षण विभागातील एकूण २४ केंद्रस्तरीय विशेष शिक्षकांपैकी तब्बल १६ शिक्षकांची मतदार यादी विशेष पुनरीक्षण मोहिमेसाठी बीएलओ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, एक महिना त्यांच्या अनुपस्थितीत विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. शिक्षण विभागाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे दिव्यांग विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार आहे .

संघटनेचे जिल्हाध्यक्ष उमेश शिंदे यांनी सांगितले की, विशेष शिक्षकांचे कार्य हे अत्यंत तांत्रिक, संवेदनशील आणि कौशल्याधारित स्वरूपाचे असते. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, मानसिक, शारीरिक आणि शैक्षणिक गरजांनुसार त्यांना सातत्याने मार्गदर्शन, विशेष अध्यापन आणि विविध प्रकारच्या थेरपीची आवश्यकता असते. अशा परिस्थितीत या शिक्षकांना निवडणूक, जनगणना, सर्वेक्षण किंवा इतर अशैक्षणिक कामांमध्ये गुंतविणे म्हणजे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांवर थेट गदा आणणारे आहे.

निवेदनात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचाही उल्लेख करण्यात आला असून, विशेष शिक्षकांची नियुक्ती ही केवळ दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांच्यावर बीएलओसारखी अतिरिक्त जबाबदारी सोपविणे हे न्यायालयीन निर्देशांच्या विरोधात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

संघटनेने पुढे म्हटले आहे की, विशेष शिक्षकांना वारंवार अशैक्षणिक कामांवर पाठविल्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या नियमित शिक्षणात मोठा अडथळा निर्माण होत आहे. काही ठिकाणी सामान्य शाळेत शिक्षक नसल्यास तिथे ही विशेष शिक्षकांना सक्तीने थांबविले जाते. एकंदरीत मनमानीपणे विशेष शिक्षकांचा वापर केला जात असून. स्थानीय अधिकाऱ्यांकडून सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आणि कायदे यांना हरताळ फासेल जात आहे .अशा बेकायदेशीर कामकाजावर तात्काळ बंदी आणावी असे निवेदनात म्हटले आहे. परीक्षा कालावधीत आवश्यक मार्गदर्शन मिळत नसल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवरही परिणाम होत आहे. अनेक विद्यार्थ्यांना वैयक्तिक अध्यापन आणि पुनर्वसन सेवा वेळेवर मिळत नसल्याने त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर विपरीत परिणाम होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात यावी, विशेष शिक्षकांना बीएलओ व इतर अशैक्षणिक कामांतून तात्काळ मुक्त करण्यात यावे आणि दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षण कोणत्याही परिस्थितीत बाधित होणार नाही, यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देश १३२/२०१६, ८ ऑक्टोबर २०२४ शासन निर्णय आणि दिव्यांग RPWD कायदा २०१६ याचे काटेकोरपणे अनुपालन व्हावे, अशी मागणी केंद्र विशेष शिक्षक सेलच्या वतीने करण्यात आली आहे.

# आनंदऋषीजी योगा सेंटर

## आनंदयोग मधील योग साधकांचे अभिप्राय

योगशास्त्र हे अतिप्राचीन भारतीय शास्त्र आहे. आता पाश्चात्य देशांमध्येही हे शास्त्र पोहोचले आहे.

मनावर ताबा ठेवून सकारात्मक विचार करायला लावणारे हे शास्त्र आहे. आत्ताच्या धावपळीच्या गतिमान जगात शरीर व मन स्थिर ठेवण्यासाठी आणि आनंदी, आरोग्यपूर्ण जीवन जगण्यासाठी योगशास्त्र आचरणात प्रत्येकाने आणले पाहिजे.

योग्य वयातच स्वतःच्या शरीराकडे फारसे लक्ष न दिल्याचाही हा परिणाम आहेच. योगासने शरीर निरोगी व तंदुरुस्त ठेवतात. सर्व व्याधींवर नैसर्गिक उपचार म्हणजे योग. भविष्यात येणारे दुःखही योगामुळे टाळता येतात. आरोग्य हीच धनसंपत्ती आहे याचे महत्व आत्ता पटते आहे.

मला शाळेचे काम करताना चक्कर आल्याने मी बेशुध्द होतो. माझा स्वभाव चिडचिडा असल्याने थोडे जरी मनाविरुध्द झाले तरी माझा बी.पी./शुगर वाढायची. त्यामुळे जेवण नियमित वेळेवर जवळ डबा असूनही होत नव्हते. माझ्या सहकाऱ्यांनी मला पारनेरहून नगरच्या साईदीप हॉस्पिटलमध्ये अ‍ॅडमिट केले. सर्व प्रकारच्या तपासण्या केल्या. यात डोक्याचा सी.टी. स्कॅन, मेंदूच्या इतर तपासण्या, स्ट्रेस टेस्ट, अँजोग्राफी केली. सर्व रिपोर्ट नॉर्मल होते.

अनिल मेहेर सर यांना मी माझी सर्व व्यथा सांगितली. प्रथम त्यांनी ऑनलाईन क्लास कर जर जमले तर प्राणायाम कर. क्लासप्रमाणे शरीराची हालचाल कर. त्यानंतर नारायण साळुंके (कोल्हापूर) यांचे शिबिर आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आहे यात सहभाग घे, नंतर पाहू असे सांगितले.

शिबिरानंतर मेहेर सरांनी मला योगक्लास मध्ये येत जा. सर्व प्रकारच्या व्याधी हळू हळू दूर होतील. सरांच्या मार्गदर्शनानुसार मी डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात योगवर्गामध्ये येण्यास सुरुवात केली.

दररोज योगा करताना होणारा त्रास (अंगदुखी) सरावाने कसा दूर होतो हे नियमित सांगायचे. आपल्या व्याधी सरावाने दूर होतात व सकारात्मक विचार करण्यास प्रोत्साहन देतात. त्यामुळे माझ्या व्याधी कमी झाल्या.

सर योगवर्गातील सर्व साधकांच्या अडीअडचणी समजून त्यावर सकारात्मक मार्गदर्शन करत.

सर्व साधकांची सहल आयोजित करुन निसर्गाशी मनुष्याने कसे एकरुप व्हावे याचे अनुभव प्रत्येकाला दिले. साधकांच्या कला गुणांना वाव देतात.

हास्यविनोद, झुंबा, ध्यान, श्वसन क्रियेचा स्वअनुभव अभ्यासणे याचा रोज अनुभव देतात.

सर्व साधकांचे वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस, विशेष सुयश साजरे करतात. सामुदायिक काम कसे करावे, सामुहिक आनंद कसा घ्यावा. नेहमी सकारात्मक असावे. कोणताही साधक चुकला तरी त्याला चुकीची जाणीव करु न देता, प्रोत्साहन देतात. आनंदाने पुढील कर्तव्याचे मार्गदर्शन करतात.

अनिल मेहेर सर गेली ३५ वर्षे अखंड योगाची सेवा करतात. त्यामुळे अनेक साधकांना याचा फायदा झाला. सर्व साधक सरांच्या मार्गदर्शनाचा आपल्या परिवारात, मित्रमंडळीत दररोज उल्लेख करतात.



**– संतोष कुलकर्णी,**
भक्ताची देवी मंदिर, गुजरगल्ली,
अहिल्यानगर

# छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

नगर – धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनकार्याचा गौरव करत त्यांच्या शौर्य, स्वाभिमान आणि धर्मनिष्ठेचा प्रेरणादायी वारसा समाजासमोर मांडला.

यावेळी बोलताना संपत बारस्कर म्हणाले की, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांनी अवघ्या नऊ वर्षांच्या कार्यकाळात १२० हून अधिक लढाया लढल्या आणि एकही युद्ध न हरता मोगल सत्तेला समर्थपणे रोखून धरले. त्यांचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व, असामान्य विद्वत्ता आणि हिंदू धर्मावरील अखंड निष्ठेमुळे त्यांना 'धर्मवीर' ही गौरवपूर्ण उपाधी मिळाली. ते पुढे म्हणाले की, कोणत्याही परिस्थितीत छत्रपती संभाजी महाराजांनी स्वाभिमान, राष्ट्रनिष्ठा आणि धर्माशी कधीही तडजोड केली नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी स्वराज्याचे सक्षम नेतृत्व करत शत्रूंचा धैर्याने मुकाबला केला. राज्यकारभारात त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शेती सुधारणा यांना विशेष प्राधान्य दिले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि पराक्रमामुळे स्वराज्य अधिक बळकट झाले. धर्मवीर संभाजी महाराजांचे जीवन हे शौर्य, त्याग, राष्ट्रप्रेम आणि स्वाभिमानाचे जिवंत उदाहरण असून आजच्या युवकांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.



छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले, प्रा. माणिक विधाते, नगरसेवक बाळासाहेब पवार, प्रकाश भागानगरे, सुरेश बनसोडे, महेश तवले, रेवन्नाथ पवार, मयूर बांगरे, गोरख पडोळे, सुरज कोतकर, जॉय लोखंडे, सुरत शिंदे, नितीन घोडके, तुषार यादव, मारुती पवार, वैभव ढाकणे, संतोष ढाकणे, सागर गुंजाळ, भाऊ बारस्कर, सचिन पवार, रवी दंडी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त उपस्थितांना शुभेच्छा देत त्यांच्या जीवनपटावर प्रकाश टाकला. संभाजी महाराजांचे अद्वितीय शौर्य, त्याग, राष्ट्रभक्ती आणि धर्मरक्षणासाठी दिलेले बलिदान हे प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत त्यांच्या विचारांचे आचरण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# बायपासच्या पुलाखाली दबा धरून बसलेल्या सराईत गुन्हेगाराला रात्र गस्त पथकाने पकडले

नगर – नगर–जामखेड रोडवर सारोळा बद्धी शिवारात बायपास रस्त्याच्या पुलाखाली रात्रीच्या अंधारात गुन्ह्याच्या उद्देशाने स्वतःचे अस्तित्व लपवून संशयास्पद रितीने दबा धरून बसलेल्या एका सराईत गुन्हेगाराला नगर तालुका पोलिसांच्या रात्र गस्त पथकाने पकडले आहे. महेश अशोक पवार (वय ३०, रा. निंबोडी, ता. नगर) असे पकडलेल्या आरोपीचे नाव आहे.

नगर तालुका पोलीस ठाण्याचे पो.कॉ. विक्रांत भालसिंग यांच्या सह पथक हे रात्र गस्तीवर असताना २५ जून रोजी पहाटे १.३० च्या सुमारास सारोळा बद्धी बायपास ब्रिजजवळ, जामखेड–नगर रोडवर रोडच्या कडेला एक इसम संशयास्पद अवस्थेत आढळून आला. तो काहीतरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने तिथे दबा धरून बसला होता. पथकाने त्याला झडप घालून पकडले असता तो सराईत गुन्हेगार महेश अशोक पवार असल्याचे समोर आले. त्याच्याकडे येथे थांबण्याच्या उद्देशाबाबत विचारपूस केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे पथकाने त्याला पकडून पोलीस ठाण्यात आणले व त्याच्या विरुद्ध पो. कॉ. भालसिंग यांच्या फिर्यादी वरून महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

